नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १७७ * * अकोला * मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## आंध्रात एर्नाकुलम एक्सप्रेसला आग : १ ठार

■ वृत्तसंस्था, विशाखापट्टणम, दि. २९ :
विशाखापट्टणमपासून ६६ किमी अंतरावर असलेल्या येलामंचिली येथे टाटानगर-एनार्कुलम एक्सप्रेस ट्रेनच्या दोन डब्यांना आग लागल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला. रविवारी रात्री १२:४५ वाजता ट्रेनला आग लागली. त्यावेळी ट्रेन आंध्र प्रदेशातील अनाकापल्ली येथील येलामंचिली रेल्वे स्थानकावर पोहोचली होती.

एका डब्यात ८२ आणि दुसऱ्या डब्यात ७६ प्रवासी होते. पोलिसांना इ १ डब्यातून एक मृतदेह सापडला. मृताची ओळख ७० वर्षीय चंद्रशेखर सुंदरम अशी झाली आहे. जळालेले डबे ट्रेनपासून वेगळे करून एनार्कुलमकडे रवाना करण्यात आले.

## तीन तिघाडा, काम बिघाडा




आता महाराष्ट्रातील महानगरपालिकांची महा निवडणूक महा अडचणीची झालेली दिसते. राज्यातील दोन महागठबंधने जी महाघट्ट झालेली होती, ती महाबिघाडाच्या महापर्वात महाबिलंदर चौकटीत अडकलेली आहेत. राज्यातीलच कशाला देशातील सर्वात मोठा पक्ष असलेला भारतीय जनता पक्ष अत्यंत प्रभावी दिसत असला, तरी त्या पक्षातील आद्य आणि विवाद्य यांच्यात मतभेद झाल्याने इतका मनभेद झालेला आहे की, त्यामुळे या बलाढ्य पक्षाला बरीच कसरत करावी लागेल असे दिसते. भारतीय जनता पक्ष देशात आणि राज्यात सत्तेवर आल्यानंतर इतर पक्षातील अनेक दिग्गजांचे भारतीय जनता पक्षावरील प्रेम समुद्राच्या भरतीसारखे उफाळून आलेले होते. त्यामुळे काँग्रेस सारख्या जुन्या पक्षाला लागलेली ओहोटी स्वच्छपणे दिसून येत होती आणि अजूनही दिसत आहे. आपल्या राज्यात एकसंघ शिवसेना ही आजपर्यंत दादागिरीने वागत होती. आता शिवसेनेचे दोन तुकडे झाल्यावर शिवसेनेची शक्ती नक्कीच विभागली गेलेली आहे, कारण अनेक प्रभावी नेते भारतीय जनता पक्षाच्या हिरव्यागार वनराईत दाखल झालेले आहेत. भारतीय जनता पक्षाची सत्ता आणि आगंतुक लोकांचा वैयक्तिक प्रभाव निश्चितच त्या पक्षाच्या भाव वाढीला मदत करणार आहे, पण... या पणनेच गडबड केली आहे. नव्या आगंतुकांना मदत न करण्याचे धोरण ठरवले तर काय होईल याचा आम्हाला अंदाज नाही. आता हेच बघा ना, देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि अजित दादांचा राष्ट्रवादी पक्ष आहे हा त्रिकोण फिट्ट बसलेला आहे पण, राज्यातील महानगरपालिकांच्या बाबतीत किंवा यापूर्वी झालेल्या नगरपरिषदा किंवा काही नगरपालिकांच्या बाबतीत या त्रिकोणाचा कुठे काटकोन तर कुठे षटकोन झालेला आपण बघितलेला आहे. सध्या वेगवेगळ्या महानगर पालिकांमध्ये प्रत्येक ठिकाणी वेगवेगळी समीकरणे दिसत आहेत. त्यामुळेच मंत्रिमंडळात अमरप्रेम आणि कुशलक्षेम पण बाहेर निघाल्यावर तंटे-बखेडे आणि हमरातुमरी किंवा विरोधी पक्षांबरोबर चुंबाचुंबी हे प्रकार हमखास दिसत आहेत. हे झाले महायुतीचे, मग महाआघाडीत तरी काय चालले आहे. तर दिल्लीत चुंबाचूंबी, महाराष्ट्र विधानसभेत मौनधारणा मात्र, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषदा आणि नगरपालिकेच्या निवडणुकांच्या नंतर आता महापालिका मध्ये परस्पर महायुद्ध सुरू झालेले आहे. मुंबई महानगर पालिकेसाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राज श्रीकांत ठाकरे यांच्या शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची गळाभेट झाल्यावर काँग्रेस पक्षाने आपला गळा वाचवण्यासाठी म्हणा किंवा आपल्या उरलेल्या कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी म्हणा, मैदानात एकट्याने उतरण्याचा निर्णय घेतला. या निर्णया मधील काँग्रेसचे संचित आणि त्यांच्या सोबतचे वंचित यांचा लढाऊ बाणा कितपत फायदेशीर ठरेल ते आपण १५ तारखेनंतर बघणारच आहोत. या महानगरपालिकेत दोन्ही मित्रपक्ष दारासिंग आणि किंगकॉंग यांच्यातील कुस्ती प्रमाणे मैत्रीपूर्ण लढतीत उतरणार आहेत. परंतु ही लढाई मैत्रीपूर्ण आहे की, मैत्री पूर्ण झाल्यानंतरची आहे हे कोणालाही पूर्णपणे समजलेले नाही. इतर अनेक पक्ष केवळ मुंबईतच नाही तर इतरही अनेक महानगर पालिकांमध्ये आपले नशीब आजमावण्यासाठी उतरलेले आहेत. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साखरेची निर्मिती होते असेच हे इतर पक्ष साखर पेरणीचा अवलंब करणार आहेत. त्या बिचाऱ्यांजवळ ज्या नोटांनी साखर विकत घेता येते, तशी एखादी नोट असते. ती एक नोट विरुद्ध १०० ते २०० नोटा असा हिशोब असल्यावर त्यांच्याशी लढाई लढताना त्यांच्याकडे साखरेचे अवघे शंभर-दोनशे कणच असू शकतात. अशा प्रकारच्या चौफेर लढाईत नशिबाने कोण जिंकणार आणि नशिबाने कोण हरणार हे लढणा ऱ्यांनाही ठाऊक नसते आणि पडणाऱ्यांनाही ठाऊक नसते. आजच्या घडीला इतर सर्व महानगर पालिकांमध्ये काहीही झाले तरी चालेल. मात्र, काही पक्षांना मुंबई महानगर पालिकेची तिजोरी आपल्याच हातात राहावी यातच प्रचंड मोठे स्वारस्य आहे. आम्ही या तीन तिघाडाला आणि आघाडीच्या बिघाडाला वाचवण्याची विनंती करण्याशिवाय अजून काय बरे करू शकतो? आमचे सोडा या महापालिकेचे महामतदार तरी काय करू शकतात? खरे आहे की नाही?

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# मनपा निवडणुकीत राज्यभरात नाराजीचा भडका!

## कुठे संताप, कुठे अश्रू, कुठे ठिय्या तर कुठे पायावर लोटांगण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / मुंबई, दि. २९ :
राज्यातील महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची रणधुमाळी शिगेला पोहोचली आहे. या प्रक्रियेत निष्ठावंत कार्यकर्त्यांची कुचंबणा होत असून, राज्यभरात नाराज कार्यकर्त्यांच्या संतापाचा भडका उडाल्याचे दिसून आले.

जळगावमध्ये तिकीट न मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या एका महिला कार्यकर्तीला रडू कोसळले, तर पुण्यात भाजप नेत्याने उमेदवारी मिळाल्यावर चक्क मंत्र्यांच्या चरणी लोटांगण घातले.

जळगाव महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १० मध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून इच्छुक कलाबाई शिरसाठ यांनी उमेदवारी अर्ज तर दाखल केला, मात्र पक्षाकडून 'एबी' फॉर्म मिळण्याची चिन्हे कमी दिसताच त्यांना भररस्त्यात रडू कोसळले.







### मंत्री गुलाबराव पाटील बैठकीतून बाहेर



नाराजीनाट्याचा एक अंक जळगावमध्ये पाहायला मिळाला. भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या झालेल्या बैठकीत मंत्री गुलाबराव पाटील बाहेर पडले. बैठक सुरू झाल्यावर अवघ्या १५ मिनिटांतच वातावरण तापले. उभय नेत्यांमध्ये केवळ १५ मिनिटे चर्चा झाली आणि जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील बैठकीतून निघून गेले.

### 'मातोश्री'समोर आंदोलन

आपल्या आई-वडिलांनी पक्षासाठी दिलेले योगदान आणि त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी आपल्याला ठाकरेंच्या शिवसेनेकडून नगरसेवक पदासाठी उमेदवारी मिळावी, या मागणीसाठी अंजली सूर्यवंशी आणि चेतन सूर्यवंशी या बहीण-भावाने मातोश्रीच्या गेटसमोरच आंदोलन केले.

याआधी आपले आई-वडील होते, आता पुन्हा वॉर्ड अनुसुचित जातीसाठी आरक्षित झाल्यामुळे सूर्यवंशी भावंडांनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून उमेदवारी मागितली आहे. उद्धव ठाकरे आम्हाला येऊन भेटल्याशिवाय आम्ही येथून हटणार नाही, असा पवित्रा या भावंडांनी घेतला होता.

मुंबई महापालिकेच्या अनेक जागांवर जुन्या निष्ठावंतांच्या वारसांनी दावा ठोकल्यामुळे शिवसेनेच्या नेतृत्वासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे.

### रणरागिणी वेटिंगवर



उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची 'तोफ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या किशोरी पेडणेकर अजूनही पक्षाच्या 'वेटिंग लिस्ट'वर असल्याचे चित्र आहे. पक्षाने जाहीर केलेल्या ७५ उमेदवारांच्या पहिल्या यादीत किशोरी पेडणकेरांचे नाव नसल्याने राजकीय चर्चांना उधाण आले असून, त्यांना पुन्हा संधी मिळणार की त्यांचा पत्ता कट होणार? याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

काही दिवसांपूर्वी जेव्हा दोन्ही ठाकरे बंधू (उद्धव आणि राज ठाकरे) एकत्र येण्याचे संकेत मिळाले होते, तेव्हा किशोरी पेडणेकर यांनी आपली भूमिका मांडली होती. दोन्ही ठाकरे एकत्र आल्यावर आम्ही १३० हून अधिक जागा जिंकू, असा दावा करतानाच त्यांनी स्वतःच्या उमेदवारीबाबतही सकारात्मक संकेत दिले होते. मात्र, प्रत्यक्षात पहिल्या यादीत नाव न आल्याने आणि 'एबी' फॉर्मसाठी ताटकळत राहावे लागल्याने किशोरी पेडणेकरांच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

## घुसखोरांना हाकलून लावू

■ वृत्तसंस्था, गुवाहाटी, दि. २९ :
आसाममधील नौगाव येथे सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा बटाद्रवा स्थान पुनर्विकास प्रकल्पाचे उद्घाटन केले. शहा म्हणाले, हिमंता बिस्वा सरमा यांनी बांगलादेशी घुसखोरांकडून एक लाख बिघा जमीन मुक्त केली आहे. याचप्रमाणे आम्ही संपूर्ण देशातून घुसखोरांना हाकलून देऊ.



आज मला गोपीनाथ बोरदोलोई यांची आठवण करायची आहे. जर ते नसते, तर आज आसाम आणि संपूर्ण ईशान्य भारत भारताचा भाग नसता, असे सांगत शहा म्हणाले की, गोपीनाथ यांनीच जवाहरलाल नेहरू यांना आसाम भारतात ठेवण्यासाठी भाग पाडले होते.

केंद्र सरकारने उग्रवादी संघटनांसोबत शांतता करार केले आहेत, त्यापैकी ९२% अटी पूर्ण झाल्या आहेत. आसाममध्ये शांतता आणि विकासाची स्थिती मजबूत झाली आहे. आसाममध्ये केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे शांतता, विकास आणि सांस्कृतिक संरक्षण होत आहे. गुवाहाटीमध्ये नवीन सुरक्षा व्यवस्थेमुळे शहर सुरक्षित होईल. पुन्हा एकदा आसामच्या जनतेने भाजपला आपले समर्थन द्यावे. आम्ही संपूर्ण आसामला घुसखोरांपासून मुक्त करू. जे लोक घुसखोरांना व्होट बँक मानतात, ते असे कधीही करू शकत नाहीत, असे शहा म्हणाले.

अमित शहा यांनी बटाद्रवा थान येथे २२७ कोटी रुपये खर्चून पुनर्विकसित केलेल्या श्रीमंत शंकरदेव आविर्भाव क्षेत्राचे उद्घाटन केले. त्यांनी गुरु आसन (पूजनीय गादी) असलेल्या मुख्य इमारतीला भेट देऊन दर्शनही घेतले.

## ४ तास आरक्षित रेल्वे तिकीट बुकिंग आधारशिवाय नाही..

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २९ :

**आजपासून नियम**

२९ डिसेंबरपासून आधार लिंक नसलेले आयआरसीटीसी वापरकर्ते सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत तिकीट बुक करू शकणार नाहीत. हा नियम केवळ आरक्षित रेल्वे तिकीट बुकिंग सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी लागू होईल. आरक्षित तिकिटांची बुकिंग ट्रेन सुटण्याच्या तारखेच्या ६० दिवस आधी सुरू होते.

रेल्वे हा नियम तीन टप्प्यांत लागू करत आहे. पहिला टप्पा आजपासून लागू झाला आहे, तर दुसरा टप्पा ५ जानेवारीपासून आणि तिसरा टप्पा १२ जानेवारीपासून लागू होईल. २९ डिसेंबरपासून आधार लिंक नसलेले वापरकर्ते सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत तिकीट बुक करू शकणार नाहीत. ५ जानेवारीपासून सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत तिकीट बुकिंगवर बंदी राहील. १२ जानेवारीपासून सकाळी ८ ते रात्री १२ वाजेपर्यंत अशा वापरकर्त्यांची तिकीट बुक होणार नाही.

याचा उद्देश पहिल्या दिवशी जास्तीत जास्त प्रवाशांना ऑनलाइन तिकीट बुक करण्याची संधी देणे आणि बनावट खात्यांद्वारे होणारी बुकिंग थांबवणे हा आहे.

## विजय महत्त्वाचा!

### जोमाने काम करा : राज ठाकरेंचे मनसैनिकांना आदेश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :
शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट आणि मनसे यांची निवडणूक आघाडी जाहीर होताच राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट आदेश देत जागा नव्हे, विजय महत्त्वाचा.. असा ठाम राजकीय संदेश दिला आहे.



मुंबईतील मनसेच्या विशेष मेळाव्यात बोलताना राज ठाकरे यांनी युतीतील जागावाटपावरून चर्चा सुरू असल्याचे मान्य केले, मात्र त्याला दुय्यम स्थान देत थेट रणशिंग फुंकले. मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी आणि मुंबई वाचवण्यासाठी जागांची संख्या क्षुल्लक आहे. प्रत्येकाने विजयाला प्राधान्य द्या, असे निर्देश त्यांनी कार्यकर्त्यांना दिले.

राज ठाकरे म्हणाले, कुणाला किती जागा मिळाल्या, यात वेळ घालवू नका. संकट ओळखा. आज गाफील राहिलो तर उद्या मुंबई आपल्या हातातून निसटेल. दुसऱ्यांची वाईट स्वप्ने गाडायची असतील, तर आता एकजुटीने मैदानात उतरण्याची वेळ आली आहे. निवडणूक केवळ राजकीय नव्हे, तर अस्तित्वाची लढाई असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## नाशिकमध्येही महायुतीचे फिस्कटले

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. २९ :
नाशिक महानगरपालिका निवडणुकीसाठी जागावाटपाचा तिढा सुटण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. अखेर महायुतीत फूट पडली असून, सोमवारी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवाळ यांनी शिंदेसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) एकत्र निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे.



नरहरी झिरवाळ यांनी स्पष्ट केले की, महायुती म्हणून एकत्र लढण्याची आमची इच्छा होती, परंतु भाजपने घेतलेल्या भूमिकेमुळे आता आम्हाला स्वतंत्र विचार करावा लागत आहे. आमची चर्चा सुरू झाली असून, पूर्ण जागांबाबत विचार करू.

## शहाजीबापूंनी सांगितला स्वर्गाचा रस्ता

### धनुष्यबाणाचे बटन दाबले त्यांनाच स्वर्गात जागा

■ वृत्तसंस्था, सांगोला, दि. २९ :
सांगोल्याच्या सभेत बोलताना शिवसेना शिंदे गटाचे नेते शहाजीबापू पाटलांनी अजब वक्तव्य केले आहे. शिवसेनेला मतदान करणारे स्वर्गात जाणार असल्याचे विधान त्यांनी केले आहे. ज्यांनी धनुष्यबाणाचे बटन दाबले त्याला स्वर्गातच जागा आहे, असेही शहाजीबापू पाटलांनी म्हटले आहे.



सभेत बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, मी खात्रीने सांगतो, ज्यांनी ज्यांनी धनुष्यबाण दाबला त्यांना त्यांना स्वर्गातच जागा आहे. नरकात तुम्हाला देव घेत नाही. स्वर्गात तुम्ही गेल्याशिवाय राहत नाही.

देव तुम्हाला नरकात जाऊच देत नसतो. मात्र, ज्यांनी विरोधकांची बटणं दाबली त्यांचे काय खरे नाही त्यांच्यात रामच उरला नाही, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

तसेच यावेळी बोलताना शहाजीबापू पाटलांनी विधानसभेतल्या पराभवावरून देखील दीपक साळुंखेंवर टीका केली. ते म्हणाले, मी भाकरीत साप पाळला होता म्हणूनच मला विधानसभेला पराभवाचा फटका बसला, असे ते म्हणाले. तसेच आपण आजही महायुतीत आहे. आपल्याला युतीचेच काम करायचे असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

शहाजीबापू पाटील म्हणाले, हा मतदारसंघ २०१४ पासून शिवसेनेचा आहे. तुम्ही आमचा सन्मान ठेवा आम्ही तुमचा कोणताही शब्द खाली पडू देणार नाही. पण तुम्ही तसे केले नाही, तर आम्ही पुन्हा एकट्या वाटेने जाऊ.

## काँग्रेसची ८७ उमेदवारांची पहिली यादी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :
मुंबई महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेसने सोमवारी ८७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत जुन्या चेह ऱ्यांना संधी देताना काँग्रेसने नेत्यांच्या निकटवर्तीयांना निवडणुकीचे तिकीट दिले आहे. जुन्या चेह ऱ्यांमध्ये शीतल म्हात्रे, अजंता यादव , आशा कोपरकर यांचा समावेश आहे.

काँग्रेसने मुंबई महापालिका निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडी आणि राष्ट्रीय समाज पक्षासोबत युती केली आहे. या दोन्ही घटक पक्षांना सोडलेल्या जागा वगळून काँग्रेसने आज ८७ उमेदवारांची यादी घोषित केली. काँग्रेसच्या या यादीत अल्पसंख्याक आणि उत्तर भारतीय उमेदवारांची संख्या लक्षणीय आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने मुंबईतील आपल्या सात उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. त्यानुसार प्रभाग क्रमांक १३ मधून अजित रावराणे, प्रभाग क्रमांक १४० मधून संजय कांबळे तर प्रभाग क्रमांक ४८ मधून अ‍ॅड. गणेश शिंदे यांना उमेदवारी मिळाली आहे. माजी मंत्री महादेव जानकर यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय समाज पक्षानेही आज मुंबईतील सहा उमेदवारांची घोषणा केली आहे. अन्य उमेदवारांची यादी मंगळवारी जाहीर होईल.

## सुप्रीम कोर्टाची आपल्याच आदेशाला स्थगिती

■ वृत्तसंस्था, जयपूर, दि. २९ :

**अरवली केस**

अरवली पर्वतरांगेबाबत निर्माण झालेल्या वादावर आज (सोमवारी) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी आदेश दिला आहे की, तज्ञ समितीच्या शिफारसी आणि त्यावर सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या पुढील टिप्पण्या सध्या स्थगित राहतील. पुढील सुनावणीपर्यंत या शिफारसी लागू केल्या जाणार नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणाची पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी होईल.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, या प्रकरणात न्यायालयाचे आदेश, सरकारची भूमिका आणि संपूर्ण प्रक्रियेबाबत अनेक गैरसमज पसरवले जात आहेत.

गैरसमजांना दूर करण्यासाठी एक तज्ञ समिती स्थापन करण्यात आली होती, असे त्यांनी सांगितले. समितीने आपला अहवाल सादर केला होता, जो न्यायालयाने स्वीकारला होता.

## मुंबईत राज ठाकरेंना धक्का

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :
मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे आणि मनसे यांच्यात ऐतिहासिक युती झाली असली, तरी या युतीमुळे कार्यकर्त्यांमधील धुसफूस आता चव्हाट्यावर येऊ लागली आहे.

मनसेच्या ज्येष्ठ नेत्या आणि पक्षाच्या सरचिटणीस स्नेहल जाधव यांनी आपल्या सर्व पदांसह प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. वॉर्ड क्रमांक १९२मध्ये उमेदवारी देताना विश्वासात न घेतल्याचा ठपका ठेवत त्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे, ज्यामुळे मनसेच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे.

## ज्येष्ठ स्वयंसेवक रमेश मंत्री यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :
नागपूरच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात नावलौकिक असलेले आरएसएसचे ज्येष्ठ स्वयंसेवक, रमेश मंत्री यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने केवळ क्रीडा क्षेत्रातच नव्हे तर राजकीय व सामाजिक क्षेत्रातही शोक व्यक्त केला जात आहे.



रमेश मंत्री हे नागपूर व्हॉलीबॉल क्लबचे माजी अध्यक्ष होते. गेली अनेक वर्षे ते भाजपाचे पदाधिकारी आणि संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक राहिलेत. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. भाजपा, काँग्रेससह इतर पक्षीय नेते, समाजसेवक आणि मित्रमंडळी शोकसोबत सहभागी झाले होते.

दरम्यान, रमेश मंत्री यांच्या निधनानंतर अनेक नेत्यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले की, नागपूरमधील भाजपचे ज्येष्ठ नेते रमेशजी मंत्री यांच्या निधनाचे वृत्त ऐकून अतिशय दुःख झाले. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. नागपूरमधील व्यापारी वर्गाच्या अडचणी सोडवण्यासाठी रमेशजींनी कायम प्रयत्न केला. विविध सामाजिक उपक्रमांतून त्यांनी वेळोवेळी गरजुंची मदत केली. अतिशय नम्र, मनमिळावू आणि विचारधारेप्रती समर्पित रमेशजींच्या निधनाने नागपूरची मोठी राजकीय आणि सामाजिक हानी झाली आहे.

# ७९,००० कोटी रुपयांच्या कराराला मंजुरी : लष्कराची शस्त्रशक्ती वाढणार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २९ :
संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या बैठकीत तिन्ही सशस्त्र दलांसाठी अंदाजे ७९,००० कोटींच्या संरक्षण खरेदी प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. २९ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या या बैठकीत भारताच्या लष्करी तयारीसाठी महत्त्वपूर्ण मानले जाते. या करारानंतर, लष्कराला आधुनिक शस्त्रे आणि ड्रोनविरोधी प्रणाली देखील मिळतील.

या करारांतर्गत लष्करासाठी अनेक महत्त्वाचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. लष्कराला आता लॉइटर म्युनिशन सिस्टम मिळेल, जे प्रमुख शत्रू लक्ष्यांवर अचूक हल्ला करण्यास मदत करेल. त्याचप्रमाणे, कमी-स्तरीय हलके रडार लहान, कमी-उडणारे ड्रोन आणि वअश शोधतील आणि ट्रॅक करतील. पिनाका रॉकेट सिस्टमसाठी लांब पल्ल्याच्या मार्गदर्शित रॉकेट्समुळे पिनाकाची श्रेणी वाढेल.

दरम्यान, एकात्मिक ड्रोन डिटेक्शन अँड इंटरडिक्शन सिस्टीम एमके-क्क सह, सैन्य सीमावर्ती भागात आणि अंतराळ प्रदेशातील प्रमुख लष्करी मालमत्तेचे ड्रोन हल्ल्यांपासून संरक्षण करेल.



या करारांतर्गत नौदलासाठी मंजूर केलेल्या प्रस्तावांमध्ये बोलार्ड पुल (बीपी) टग सारख्या उपकरणांचा समावेश आहे. एकदा समाविष्ट झाल्यानंतर, हे जहाजे आणि पाणबुड्यांना बंदरात आणि मर्यादित जागांमध्ये युद्धनौका करण्यास मदत करतील. हाय-फ्रिक्वेन्सी सॉफ्टवेअर डिफाइन्ड रेडिओ (एचएफ एसडीआर) बोर्डिंग आणि लँडिंग ऑपरेशन्स दरम्यान सुरक्षित आणि लांब पल्ल्याच्या संप्रेषणांना बळकट करेल. हे उच्च-उंचीचे, लांब पल्ल्याच्या ड्रोन (भाडेपट्ट्यावर) हिंद महासागर प्रदेशात सतत देखरेख, गुप्तचर आणि सागरी सुरक्षा मजबूत करतील.

त्याचप्रमाणे, या करारात हवाई दलासाठी महत्त्वपूर्ण आश्वासन आहे. हवाई दलाला एक स्वयंचलित टेक-ऑफ आणि लँडिंग रेकॉर्डिंग सिस्टम मिळेल. जे सर्व हवामान परिस्थितीत टेक-ऑफ आणि लँडिंगचे हाय-डेफिनिशन रेकॉर्डिंग प्रदान करून उड्डाण सुरक्षा वाढवेल. हवाई दलाला अ‍ॅस्ट्रा एमके-२ क्षेपणास्त्र देखील मिळेल, ज्याची पल्ला जास्त आहे आणि दूरवरून शत्रूची विमाने पाडण्याची क्षमता आहे. तेजस लढाऊ विमानासाठी पूर्ण मिशन सिम्युलेटरमुळे सुरक्षित आणि किफायतशीर पायलट प्रशिक्षण शक्य होईल. त्याचप्रमाणे, हवाई दलाला मार्गदर्शन किट देखील मिळेल, ज्यामुळे लांब अंतरावरून अचूक मारा करण्याची हवाई दलाची क्षमता आणखी वाढेल.

# मुंडे - महाजनांची भाजपला गरज नाही

महाजनांची सडकून टीका



■ **मुंबई :** मनसेला सोडचिठ्ठी देऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेत प्रवेश केलेल्या प्रकाश महाजनांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे. भाजपने मला ३ महिने ताटकळत ठेवले. त्यामुळे भाजपला आता मुंडे, महाजनांची गरज उरली नसल्याचे स्पष्ट होते, असे ते म्हणालेत.

प्रकाश महाजन यांनी गत आठवड्यात एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांची पक्षाच्या प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली. पक्ष प्रवेशानंतर लगेचच त्यांनी ठाकरे बंधूंच्या युतीवर निशाणा साधला होता. त्यानंतर आता त्यांनी शिवसेनेचा मित्रपक्ष भाजपवरही शरसंधान साधले आहे. ते म्हणाले, मी भाजपमध्ये गेलो नाही. मी त्यांची प्रवेश परीक्षा पास झालो नाही. पण ज्यांनी भाजपवर टीका केली, ते सर्वजण आज भाजपमध्ये आहेत.

दिनकर पाटील भाजपवर बोलले, ते आज भाजपत आहेत. भाजपच्या घराला दार नाही, पण पहारेकरी आहेत हे सांगण्यासाठी मी सुधीर मुनगंटीवार यांना फोन केला. पण त्यांनी तो उचलला नाही. मी तीन महिने वाट पाहिली. कारण, मला हिंदुत्त्वावर काम करायचे होते.

प्रकाश महाजन यांनी उद्धव ठाकरे व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले, ठाकरे बंधूंनी केव्हाच हिंदुत्त्व सोडले. त्यांना केवळ मुंबईतील आपले अस्तित्व टिकवायचे आहे. मोठ्या लोकांनी निष्ठा बदलली की विचार, देशहित असे म्हटले जाते. उलट गरिबांवर शेण खाल्ल्याचा आरोप होतो.

छोट्या कार्यकत्यार्ने निष्ठा सोडली की त्यांना गद्दार म्हटले जाते. मी आता अस्तित्व आहे तोपर्यंत शिवसेनेत राहणार. मी दोन्ही भावांना एकत्र येण्याचे आवाहन केले. पण ते मराठी माणसांपासून दूर जाताना दिसले. ते मला खटकले.

# माझी हकालपट्टी करा

## शिंदेंच्या निष्ठावान नेत्याची मागणी

■ **कल्याण :** महाराष्ट्रात सध्या सर्वत्र महापालिका निवडणुकीचे वातावरण झाले असून कार्यकर्ते उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न करत आहेत तर काही कार्यकर्त्यांना संधी न मिळाल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. अशातच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील नेते कैलास शिंदे यांनी पत्राद्वारे थेट हकालपट्टी करण्याची विनंती केली.

शिवसेना पक्षातून माझी हकालपट्टी करण्यात यावी ही नम्र विनंती. २४ तास गोर गरिबांकरिता कार्य करणारा, निष्कंलक २० वर्ष निःस्वार्थपणे कुष्ठ रुग्णांची सेवा करणारा अशा कार्यकत्यार्ची पक्षाला गरज नसल्याने शिवसेना पक्षातून माझी हकालपट्टी करण्यात यावी, अशा शब्दांत कैलास शिंदे यांनी शिंदे यांना पत्र लिहिले आहे.

कैलास शिंदे यांनी त्यांच्या पत्रात म्हटले की, साहेब सध्या देशात राज्यात जिल्ह्यात-शहरांत तसेच गावात ज्या प्रकारे राजकारण सुरु आहे. तर हल्ली तुमच्या एकनिष्ठ असणे, किती कार्य केले, तुमचा अनुभव, शिक्षण, यांना शुन्य महत्त्व असून तुम्ही आर्थिक किती मजबूत आहात याला महत्त्व आहे. तुमच्याकडे फक्त पैसा असेल तरच तुम्ही निवडणूक लढवण्यास पात्र आहात असा अधोरेखीत नियम झाला आहे, असे त्यांनी म्हटले.

पुढे कैलास शिंदे लिहितात की, त्यामुळे गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेब आणि गुरुबंधू एकनाथ शिंदे साहेब यांना एक कट्टर कार्यकर्ता म्हणून सर्वगुण असताना राजकारणात निवडणुकीसाठी लागणारा आर्थिक सक्षम असणे हा महत्त्वाचा गुण माझ्याकडे नाही. त्यामुळे मी कल्याण डोंबिवली महानगरपालिच्या निवडणुकीत तिकीट मिळवण्यास पात्र नाही. माज्यामुळे पक्षाचे नुकसान होऊ नये म्हणून माझी पक्षातून हकालपट्टी करण्यात यावी, ही नम्र विनंती. तसदी बद्दल क्षमस्व आणि आपणांस शुभेच्छा, अशा शब्दांत कैलास शिंदे यांनी आपल्या भावना पत्राद्वारे व्यक्त केल्या आहेत

# ठाणे महापालिका निवडणूक

## मनसेकडून उमेदवारांना 'एबी' फॉर्म

■ **ठाणे :** महापालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आता शेवटचे दोन दिवस शिल्लक असताना सर्वच राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांना एबी फॉर्म देण्यास सुरुवात झाली आहे. मुंबईनंतर ठाणे महापालिकेकडेही विशेष लक्ष असणार आहे. ठाण्यात महाविकास आघाडी आणि मनसे असे एकत्रित निवडणूक लढवणार आहेत. मनसेणे २४जागांवरील उमेदवारांना रविवारी रात्रीच एबी फॉर्म दिल्याची माहिती आहे. यातील आता ७ उमेदवारांची नावे समोर आली आहेत.

ठाण्यात मनसेने आपली सक्रियता वाढवली असून, रविवारी रात्री उशिरा जिल्हा सचिव नैनेश पाटणकर यांच्या हस्ते पहिल्या टप्प्यातील उमेदवारांना 'एबी' फॉर्मचे वाटप करण्यात आले. ठाण्यात मनसे आणि ठाकरे गटाची ताकद मोठी असल्याने, या निवडणुकीत 'ब्रँड ठाकरे' भाजप आणि शिंदे गटाच्या वर्चस्वाला धक्का देण्यात यशस्वी ठरणार का, याबाबतची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. मनसे नेते अविनाश जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा पक्षाने अनेक नवीन चेहऱ्यांना रिंगणात उतरवण्याचे धोरण स्वीकारले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट अखेर एकत्र

## पुणे, पिंपरी चिंचवड मनपा एकत्र लढणार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पुणे व पिंपरी चिंचवड येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे.

उपमुख्यमंत्री तथा सत्ताधारी राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी रविवारी रात्रीच यासंबंधीची घोषणा केली होती. त्यानंतर आता शरद पवार गटानेही त्यावर मोहोर उमटवल्यामुळे राष्ट्रवादीच्या कुटुंबाने पुन्हा एकत्र होण्याच्या दिशेने पाऊल उचलल्याचे दिसून येत आहे.

रोहित पवार आज सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, सध्या वेगवेगळ्या शहरांत वेगवेगळे समीकरण तयार होत आहे. एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यात काही गोष्टी पटत नाही अशी चर्चा आहे. पण नाशिकमध्ये या दोघांचेही पक्ष एकत्र निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे त्या - त्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन लढावे लागते. आज महापालिकेची निवडणूक आहे. त्यात विलिनीकरणाचा विषयअसता तर आम्ही संपूर्ण महाराष्ट्रात युती केली असती. पण असे काही झाले नाही. फक्त पुणे व पिंपरी चिंचवड येथे आम्ही एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे.

रोहित पवार म्हणाले, शरद पवार या विषयात कुठेच नाहीत. त्यांचे मत एवढेच आहे की, जे लोक आपल्यासाठी लढले त्यांना विश्वासात घ्या. त्यांचे म्हणणे काय? हे समजून घ्या. महापालिकेत कधीही एवढ्या मोठ्या पातळीवरचे नेते कधीही इन्व्हॉल्व्ह झाले नव्हते. शरद पवारांना पूर्वीच्या काळची सवय असल्यामुळे त्यांनी पदाधिका ऱ्यांना विश्वासात घेऊन योग्य तो निर्णय घेण्याचे सांगितले. त्यानुसार, वेगवेगळ्या शहरांत वेगवेगळे समीकरण आपल्याला पहावयास मिळत आहे. पण पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये घड्याळ व तुतारी आपल्याला एकत्र लढताना दिसून येतील.

रोहित पवार म्हणाले, उद्या अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे आजच बऱ्याचशा गोष्टी स्पष्ट होतील. आम्ही आमच्या कार्यकर्त्यांना व घड्याळाचे लोक त्यांच्या कार्यकर्त्यांना एबी फॉर्म देतील. उद्या दुपारी आम्हाला किती जागा मिळाल्या हे स्पष्ट होईल. आमचा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे.

आमच्या १०० पैकी ९५ इच्छुक कार्यकर्त्यांनी आम्हाला एकत्र येण्याचे आवाहन केले होते. त्यांच्यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे व त्यांना निवडून आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. राजकारणात काही निर्णय लवकर, तर काही निर्णय उशिरा घेतले जातात. राहिला प्रश्न पुणे व पिंपरी चिंचवडचा तर तो काल झाला नाही, अनेक दिवसांपासून या मुद्यावर चर्चा सुरू होती, असे ते म्हणाले.

### शरद पवार गट महायुतीसोबत जाणार का?

पत्रकारांनी यावेळी पुणे महापालिकेत सत्ता आली तर तुम्ही महायुतीसोबत जाणार नाही का? असा प्रश्न यावेळी रोहित पवारांना विचारला. त्यावर त्यांनी सावध प्रतिक्रिया दिली. पुणे महापालिकेचे प्रश्न वेगळे आहेत. पिंपरी चिंचवडचे प्रश्न वेगळे आहेत. महापालिकेची निवडणूक का महत्त्वाची असते, तर तिला स्वतंत्र बजेट असते. त्या बजेटच्या माध्यमातून तेथील जनतेला सेवा द्यायची असते. स्वतःचे बजेट असल्यामुळे आपण राज्य सरकारवर अवलंबून नसतो. त्यामुळे इथे ते बजेट योग्य पद्धतीने लोकांच्या हितासाठी वापरले जावे अशी अपेक्षा असते. त्यामुळे लोकल लोकांसाठी आम्ही इथे एकत्र आलोत. त्यामुळे इथे ज्या लोकांची सत्ता लोकली होती, तिथे योग्य पद्धतीचे काम केले गेले नाही असे लोकांचे मत आहे, असे रोहित पवार म्हणाले.

# संभाजीनगरमध्ये महायुतीत बिघाडी?

## भाजपच्या 'वेट अँड वॉच'मुळे शिंदेंची शिवसेना अस्वस्थ



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :** छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीसाठी भाजपसोबत युती करण्याच्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळत नसल्याने शिवसेना शिंदे गट अस्वस्थता आहे. पालकमंत्री संजय शिरसाट यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, भाजप सकारात्मक प्रतिसाद देत नसेल, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे युतीसाठी पर्यायी मार्ग काढतील.

संजय शिरसाट म्हणाले, गेल्या दोन दिवसांपासून शिवसेना भाजपच्या प्रस्तावाची वाट पाहत आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केवळ दोन दिवस शिल्लक असतानाही भाजपकडून अद्याप कोणताही प्रस्ताव आलेला नाही. तसेच छत्रपती संभाजीनगरमधील भाजप नेते प्रतिसाद देत नसल्याची माहितीही वरिष्ठांना कळवण्यात आल्याचे शिरसाट यांनी सांगितले. तसेच शिवसेनेने ४१ जागांचा प्रस्ताव भाजपला दिल्याची माहिती शिरसाट यांनी दिली आहे.

पुढे शिरसाट म्हणाले, भाजपसोबत जवळपास ८-९ बैठकी झाल्या आहेत. काही बैठकांमध्ये आम्ही सकारात्मक दृष्टिकोनातून पाऊले उचलण्याचा प्रयत्न करत आहोत. आता आज काय निर्णय होतो, त्याकडे आमचे लक्ष आहे. एवढे निश्चित आहे की ही महायुती कशा पद्धतीने पुढे न्यावी आणि यात कसा मार्ग काढावा, यासंदर्भातला निर्णय देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे घेतील.

पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, युतीबाबतची अंतिम बोलणी अद्याप झालेली नाही. भाजपने तातडीने आपला प्रस्ताव द्यावा. तसेच जागावाटपाबाबतचा अंतिम निर्णय वरिष्ठ पातळीवर होईल. यावेळी शिरसाट यांनी शिवसेना ठाकरे गटावरही जोरदार टीका केली. उबाठा गट 12 मुस्लिम उमेदवारांना रिंगणात उतरवणार असल्याच्या वृत्तावर बोलताना ते म्हणाले की, उद्धव सेना आता 'उबाठा मामू' झाली आहे. त्यांना मुस्लिमांशिवाय दुसरा कोणताही पर्याय शिल्लक नाही आणि ते केवळ मतांची बेरीज करण्याच्या तयारीत आहेत.

# तटकरेंचा पोलिसांवर दबाव

## आ. महेंद्र थोरवेंचे सुनील तटकरेंवर गंभीर आरोप

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २९ :** खोपोली नगरपालिकेच्या शिंदे सेनेच्या नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येमुळे रायगड जिल्ह्यातील राजकीय वातावरण प्रचंड तापले आहे.

या प्रकरणातील नऊ आरोपींना न्यायालयाने ५ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली असली तरी, यावरून आता शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. आमदार महेंद्र थोरवे यांनी थेट खासदार सुनील तटकरे यांच्यावर पोलिसांवर दबाव आणल्याचा खळबळजनक आरोप केला आहे, तर तटकरे यांनी या प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची मागणी केली आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांनी या हत्येमागे राजकीय षडयंत्र असल्याचा संशय व्यक्त केला आहे. राष्ट्रवादीच्या आरोपींना अटक होऊ नये यासाठी खासदार सुनील तटकरे पोलिसांवर दबाव आणत आहेत, असा थेट आरोप थोरवे यांनी केला. हत्येचा सूत्रधार 'सुतारवाडी'त (सुनील तटकरे यांचे निवासस्थान) बसला असून, जोपर्यंत सर्व आरोपींना अटक होत नाही आणि त्यांना फाशीची शिक्षा मिळत नाही, तोपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

तसेच, या प्रकरणातील गुन्हेगारांवर 'मकोका' लावण्याची मागणी त्यांनी केली असून काळोखे कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे स्पष्ट केले.



### मंगेश काळोखे हत्या प्रकरण

#### एसआयटी चौकशीतून सत्य समोर येईलच

महेंद्र थोरवे यांच्या आरोपांनंतर खासदार सुनील तटकरे यांनी तातडीने कर्जतमध्ये धाव घेत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या हत्येचे आम्ही समर्थन करत नाही, मात्र या घटनेचे राजकारण करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की सत्य लवकरच बाहेर येईल, असे तटकरे म्हणाले. या प्रकरणाची पारदर्शक चौकशी व्हावी यासाठी आपण स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे एसआयटी चौकशीची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. कोणी काय काय केले आहे, हे चौकशीतून समोर येईलच. मी योग्य वेळी बोलेन, असा इशारा देत त्यांनी कार्यकर्त्यांना संयम बाळगण्याचे आवाहन केले.

# ठाकरेंना मराठी माणसाच्या मतांची परवा नाही..

राज ठाकरेंवर दरेकरांचा पलटवार



■ **महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि.२९ :** शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मुंबईच्या जिल्हाध्यक्षा राखी जाधव यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला आहे. पक्ष प्रवेश केल्यानंतर यावेळी भाजप नेते प्रवीण दरेकर, प्रसाद लाड हे राखी जाधव यांच्यासह उपस्थित होते.

यावेळी प्रवीण दरेकर यांनी ठाकरेंवर टीका केली आहे. राज ठाकरे यांनी मोदी आणि ईव्हीएमच्या जोरावर भाजप माज करत असल्याची टीका केली होती. यावर प्रवीण दरेकर यांनी पलटवार केला आहे.

दरेकर म्हणाले, ठाकरेंचा विश्वास आता मराठी माणसावर राहिलेला नाही, हिंदू मतांवर राहिलेला नाही. त्यांना मराठी माणसाची आणि हिंदूंच्या मतांची परवा नाही. मुंबईकडे आमचे लक्ष आहे, देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष मुंबईकडे आहे, त्यामुळे वैफल्यातून आलेले हे विधान असल्याची टीका दरेकरांनी केली आहे.

प्रवीण दरेकर म्हणाले, केवळ उमेदवारी मिळावी म्हणून कोणी भाजपमध्ये येत नाही. तर विकासाचे राजकारण जे देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस करत आहेत. तसेच मुंबईचा चेहरा-मोहरा जे काही बदलत आहे. राखी जाधव या कुठल्याही पक्षातल्या असल्या तरी त्या ग्राउंडवरच्या कार्यकर्त्या आहेत. हे आपण बघितले आहे की त्या जनतेमध्ये राहिलेल्या कार्यकर्त्या आणि नेत्या आहेत.

दरेकर म्हणाले, राखी जाधव यांना खात्री होती की, माझ्या घाटकोपरचा विकास करायचा असेल, मुंबईचा विकास करायचा असेल तर देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत विकासाचे राजकारण करूया. त्यातून मुंबई राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाची अध्यक्षा राखी जाधव यांनी आज भाजपात प्रवेश केल्याचे ते म्हणाले.

# 'मातोश्री'वरील बैठकीत अनिल परब संतप्त

## तिकीट वाटपावरून वरुण सरदेसाई यांच्यासोबत झाला वाद : तावातावाने बैठकीतून निघून गेले



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :** मुंबई महापालिकेच्या मुद्यावरून अवघ्या राज्याचे राजकारण तापले आहे. त्यातच ही महापालिका आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. पण आता ठाकरे गटातच तिकीट वाटपावरून जोरदार राडा सुरू असल्याचे समोर आले आहे. र

ा प्रकरणी रविवारी रात्री उशिरा मातोश्रीवर झालेल्या बैठकीत आमदार अनिल परब व आमदार वरुण सरदेसाई यांच्यात जोरदार शाब्दिक वाद झाला. परब रागारागाने बैठकीतून निघून गेले.

मुंबई महापालिकेसाठी ठाकरे गटाने आपल्या उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप सुरू केले आहे. रविवारी रात्री सर्व उमेदवारांना मातोश्रीवर बोलावून एबी फॉर्म देण्यात आले. त्यानंतर आजही या फॉर्मचे वाटप करण्यात येत आहे. एबी फॉर्म देण्याच्या मुद्यावरून ठाकरे गटाच्या वरिष्ठ नेत्यांत जोरदार खडाजंगी रंगत आहे.

वांद्रे पश्चिम विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ९५ मधील उमेदवारीवरून अनिल परब व वरुण सरदेसाई यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. या प्रभागातून अनिल परब यांचे निकटवर्तीय शेखर वैंगणकर यांचे नाव निश्चित झाल्याची माहिती होती. पण ऐनवेळी त्यांचे तिकीट कापून श्रीकांत सरमळकर यांचे जावई हरी शास्त्री यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. हरी शास्त्री हे स्थानिक आमदार वरुण सरदेसाई यांच्या गोटातील आहेत. त्यामुळे इथे त्यांच्या निकटवर्तीय नेत्याला प्राधान्य देण्यात आले. यामुळे अनिल परब नाराज झाले.

अनिल परब यांनी आपली नाराजी स्पष्ट शब्दांत बोलून दाखवली. त्यानंतर लगेचच बैठक सोडून निघून गेले. त्यानंतर मध्यरात्री २.३० वाजेपर्यंत उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

# मुक्त विद्यापीठाच्या हिवाळी परिक्षांसाठी ऑनलाईन गृहपाठ सादरीकरणास ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २९ :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२५झ२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षा दिनांक ०७ जानेवारी २०२६ पासून सुरू होत आहेत. जानेवारी व जुलै सत्रात प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन गृहपाठ सादर करण्यास बुधवार दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांना त्यांचे सातत्यपूर्ण मूल्यमापन / अंतर्गत मूल्यमापन करण्यासाठी आवश्यक असलेले गृहपाठ ऑनलाईन अपलोड करण्याची कार्यप्रणाली विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार परीक्षा विभागाने विकसित केलेली आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या कायम नोंदणी क्रमांकाच्या (पीआरएन) आधारे लॉगीन करून, विषयनिहाय वैयक्तिक माहिती असलेली उत्तरपुस्तिका डाऊनलोड करून या उत्तरपुस्तिकेमध्ये असलेल्या गृहपाठाचे प्रश्न आपल्या हस्ताक्षरामध्ये लिहून त्या पीडीएफ स्वरुपात पोर्टलवर विषयनिहाय अपलोड करायच्या आहेत. मुदतीत गृहपाठ सादर न करणा ऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित विषयात अनुपस्थित दर्शवून निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी ०८०७११८८७८९, ८००७२५३०४४, ८०५५२५३०७२ या मदत क्रमांकावर संपर्क साधावा. ऑनलाईन गृहपाठ सादरीकरणासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना, कार्यपद्धती तसेच संबंधित शिक्षणक्रमांची यादी विद्यापीठाच्या http://asm.ycmou.org.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत गृहपाठ सादर करून सूचनांचे पालन करावे, असे आवाहन परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.

# गद्दारी की बंडखोरी?

## निवडणुकीच्या रणधुमाळीतला हमखास शब्द

राज्यभरात २९ महानगर पालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. उद्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस. आज प्रत्येक पक्षाच्या कार्यालयात धावपळ, नाराजी, गुप्त बैठका आणि फोनाफोनीचा धडाका सुरू आहे. कारण एकच–तिकीट.

ज्यांना उमेदवारी मिळणार नाही, त्यातील अनेक जण पक्षाशी निष्ठा तोडून अपक्ष किंवा प्रतिस्पर्धी आघाडीच्या झेंड्याखाली उमेदवारी दाखल करतील. तेव्हा लगेच राजकीय शब्दकोशातले दोन शब्द ऐकू येतात–गद्दार आणि बंडखोर. गंमत म्हणजे, एकाच व्यक्तीसाठी हे दोन्ही शब्द वापरले जातात; फरक फक्त पाहणाऱ्याच्या नजरेत असतो.

**गद्दारी म्हणजे काय?**

पक्षाच्या दृष्टीने पाहिलं, तर गद्दारी म्हणजे पक्षशिस्त मोडणे. संघटनात्मक निर्णय स्वीकारण्याऐवजी स्वतःचा स्वार्थ, स्वतःची महत्त्वाकांक्षा पुढे ठेवणे. उमेदवारी न मिळाल्यामुळे बंड पुकारणे, प्रचारकाळात पक्षाविरोधात काम करणे किंवा थेट विरोधी गोटात जाणे–हे सर्व पक्षाच्या नजरेत गद्दारीच असते.

विशेषतः सत्ताधारी पक्ष असो वा विरोधक, दोघांनाही एकसंघ ताकद दाखवायची असते. त्यामुळे गद्दार हा शिक्का लावून इतरांना धडा देण्याची राजकीय गरज निर्माण होते.

महायुती असो किंवा आघाडी, दोन्हीकडे हीच भाषा ऐकू येते. पक्षाने मोठं केलं, आज पद दिलं, सत्ता दिली, तरी ऐनवेळी साथ सोडली, हा गद्दारीचा आरोप केला जातो. हा आरोप केवळ नैतिक नाही; तो राजकीय शस्त्र असतो.

**मग बंडखोरी म्हणजे काय?**

तेच चित्र जर उमेदवाराच्या नजरेतून पाहिलं, तर कथा वेगळी आहे. मी वर्षानुवर्षे काम केलं. वॉर्डात घाम गाळला. जनतेशी नाळ जोडली. तरीही वरिष्ठांनी दुर्लक्ष केलं. या भावनेतून उमेदवार स्वतःला बंडखोर म्हणवतो... गद्दार नव्हे. बंडखोरी म्हणजे अन्यायाविरोधात उभं राहणं, असा दावा केला जातो. पक्षात घराणेशाही, मजीर्तील उमेदवार, आर्थिक गणितं किंवा वरिष्ठ नेत्यांचे दबाव असतील, तर मी जनतेसाठी लढतोयह्व अशी भूमिका घेतली जाते. आघाडीतील काही घटक पक्षांमध्ये ही भावना अधिक तीव्र दिसते, तर महायुतीत सत्तेचा वाटा, पदांचं गणित आणि अंतर्गत स्पर्धेमुळे बंडखोरी उफाळून येते.

**आघाडी आणि महायुती दोघांचीच कोंडी**

महाविकास आघाडी असो किंवा महायुती–दोघांनाही बंडखोरी डोकेदुखी ठरत आहे. आघाडीत वैचारिक मतभेद, स्थानिक नेतृत्वाची नाराजी आणि जागावाटपातील कुरघोडी बंडखोरीला खतपाणी घालते. महायुतीत मात्र सत्ता, निधी, प्रभाव आणि विजयाची खात्री या सगळ्यामुळे इच्छुकांची संख्या वाढते आणि तिकीट न मिळाल्याने बंड पुकारलं जातं.

दोन्हीकडे एक समान बाब आहे–शब्दांचा वापर राजकीय सोयीप्रमाणे बदलतो. आज जो बंडखोर आहे, तो उद्या जिंकून आला तर स्वतंत्र विचारांचा नेता ठरतो. आणि तोच पराभूत झाला, तर गद्दार हा ठपका कायमचा बसतो.

**मतदारासाठी काय महत्त्वाचं?**

खरा प्रश्न असा आहे, गद्दार आणि बंडखोर या शब्दांच्या पलीकडे मतदाराने काय पाहावं? पक्षशिस्त महत्त्वाची आहे, पण लोकशाहीत उमेदवाराची कामगिरी, प्रामाणिकपणा आणि जनतेशी नातं यालाही तितकंच वजन आहे. केवळ पक्ष बदलला म्हणून तो माणूस वाईट ठरत नाही; आणि केवळ पक्षाशी एकनिष्ठ आहे म्हणून तो चांगलाच असेल, याचीही हमी नाही.

निवडणुकीच्या रणधुमाळीत गद्दारी आणि बंडखोरी हे शब्द भावनिक बाण म्हणून वापरले जातात. पक्षासाठी जो गद्दार, तो स्वतःसाठी बंडखोर असतो. शेवटी निकाल देणार मतदार असतो.. तो शब्दांपेक्षा काम पाहतो, घोषणांपेक्षा अनुभव तपासतो.

उद्या उमेदवारी अर्जांचा शेवटचा दिवस संपेल. गद्दार-बंडखोरांच्या घोषणा वाढतील. पण खरा निकाल एका शब्दाने ठरत नाही; तो ठरतो जनतेच्या निर्णयाने.

■ ■ ■



दिपक कैतके
मुंबई.

# शरद पवार गटाला भगदाड : राखी जाधव भाजपात



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :** आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाला मोठे भगदाड पडले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईत पक्षाचा किल्ला एकहाती लढवणाऱ्या आणि मुंबई जिल्हा अध्यक्षा राखी जाधव यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला.

महाविकास आघाडीच्या जागावाटपात शरद पवार गटाच्या वाट्याला केवळ ५ ते १० जागा आल्याने जाधव या प्रचंड नाराज झाल्या होत्या. या नाराजीतूनच त्यांनी तुतारी सोडून कमळ हाती घेतल्याचे समजते.

मुंबईत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटात संघटनात्मक बांधणी करण्यात राखी जाधव यांचा मोठा वाटा आहे. मात्र, ठाकरे गटासोबतच्या युतीत पक्षाला अत्यंत कमी जागा मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता होती. मिळालेल्या माहितीनुसार, जागा कमी असल्याने पक्षातील इच्छुकांना थेट अजित पवार गटात जाऊन निवडणूक लढवण्याच्या सूचना वरिष्ठांकडून देण्यात आल्या.

पक्ष कार्यालयातूनच तसे फोन गेल्याने कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली. आपल्याच कार्यकर्त्यांची दुसऱ्या पक्षात पाठवणी कशासाठी? असा सवाल करत राखी जाधव यांनी आपली नाराजी व्यक्त केली होती.

राखी जाधव म्हणाल्या, मुंबई शहराच्या हितामध्ये आणि माज्या मतदारसंघाच्या विकासकामांसाठी घेतलेला हा निर्णय आहे. आज या ठिकाणी आमच्या घाटकोपर तालुक्याचे आमदार पराग शहाजी यांच्या नेतृत्वात आपण देखील संघटित व्हायला पाहिजे असा विचार माझ्या मनात आला आणि त्यातून मी हा निर्णय घेतला. त्या पक्षात असताना अपेक्षित जो प्रतिसाद हवा होता तसा आला नाही आणि म्हणून हा निर्णय मला घ्यावा लागला आहे.

राखी जाधव म्हणाल्या, आम्ही शेवटी राजकारण जे करतो ते विकासासाठी करतो. आमचा मतदारसंघ विकसित व्हावा यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो. अशा परिस्थितीमध्ये आम्ही जर लोकांना काही देऊ शकत नसू आणि भाजपच्या माध्यमातून जर विकास काम होत आहे तो सर्वजण बघत आहे.

कार्यकर्ता आपल्या नेत्याकडे व्यक्त होत असतो आणि आपण व्यक्त होताना कुठेतरी असे वाटत आहे की आपला नेता हा आपल्या विषयांकडे दुर्लक्षित करतो, तर कधी न कधी कार्यकर्ता कुठल्या तरी निर्णयावर येतो, असे सूचक विधान राखी जाधव यांनी केले आहे.

## पातूर तालुक्यात थंडीमुळे पहिला बळी

**पातूर :** गत काही दिवसांपासून जिल्ह्यात थंडीचा कहर वाढला असून थंडीमुळे पातूर तालुक्यात पहिला मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दिनांक २८ डिसेंबर रोजी पातूर शहरातील आठवडी बाजारातील ओट्यावर एक इसम मृत अवस्थेत पडून असल्याचे स्थानिकांच्या निदर्शनास आल्याने परिसरात खळबळ उडाली असून नाना तऱ्हांच्या चर्चांना उधाण आले पातूर पोलीस होते. दरम्यान घटनास्थळी दाखल झाली असता सदर इसम हा थंडीमुळे दगावला असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

# हरीशभाई अलीमचंदाने यांची घरवासी

### खासदार,आमदारांनी केले स्वागत



**▪अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करून माझी नगराध्यक्ष हरीशभाई अलीमचंदानी, त्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये पुन्हा काम करण्याचा निर्णय केला असून त्यांचे निलंबन परत घेण्यात आले असून त्यांचे स्वागत खा. अनुप धोत्रे आ. रणधीर सावरकर जयंत मसने, संतोष शिवरकर वसत बाछुका, रंजीत खेडकर बाळटाले, रवींद्र भन्साली, गिरीश जोशी, अजय शर्मा. माधव मानकर, डॉ. अमित कावरे, संजय गोटफफोडे, नितेश पाली आधी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळून देऊ यासाठी एकत्र येऊन काम करू व पक्ष जो आदेश देईल त्या आदेशाचे पालन करेल अशा शब्दात हरीशभाई अलीमचंदानी यांनी आपल्या घरवाशीचे स्वागत करतेवेळी मनोगत व्यक्त केले .व पक्ष नेतृत्व, प्रदेश आणि स्थानिक नेतृत्वाचे आभार व्यक्त केले.

# मूर्तिजापूरमध्ये एक्सपायरी औषधांचा स्फोट; मृत्यूचा धंदा उघडकीस

### घरकुल परिसरात पोलिसांची धडक; लाखोंचा साठा जप्त, आरोग्य माफियांची पाळेमुळे उघडी

**▪अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** अकोल्यातील मूर्तिजापूर शहरात नागरिकांच्या जीवाशी थेट खेळ करणाऱ्या घातक औषध साठवणुकीचा धक्कादायक पर्दाफाश झाला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार अजित जाधव यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथकाने घरकुल परिसरातील एका घरावर अचानक छापा टाकला. या कारवाईत लाखो रुपयांचा एक्सपायरी मानवी औषधांचा साठा आढळून आला. ही औषधे बाजारात पोहोचली असती, तर गंभीर आजारग्रस्त रुग्णांच्या जीवावर बेतण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.कारवाईदरम्यान एक व्यक्ती ताब्यात घेण्यात आली असून मात्र हा साठा नेमका





कोणाच्या मालकीचा आहे, कोणत्या मेडिकल किंवा वितरण साखळीत जाणार होता, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. औषधांच्या नावाखाली नफेखोरी करत जनतेच्या आरोग्यावर घाला घालणाऱ्यांचे हे जाळे किती खोल आहे, याचा तपास सुरू आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली असून दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

## थोडक्यात

### तिळगुळाच्या मंद सुगंधाने दरवळली बाजारपेठ

**अकोला :** मकर संक्रांतीला अजून १६ दिवस बाकी असल्याने, या सणासाठी आवश्यक असलेले तीळ आणि गूळ विकणारी दुकाने शहरातील बाजारपेठेत आधीच थाटली आहेत. अकोला शहराची बाजारपेठ तीळ आणि गुळाच्या सुगंधित सुगंधाने भरलेली आहे. यावर्षी तीळ आणि गुळाच्या किमती किंचित वाढल्या आहेत. अकोला शहरात पश्चिम महाराष्ट्रातून येणाऱ्या गुळाला जास्त मागणी आहे, ज्यामुळे बाजारात गुळाची लक्षणीय आवक वाढली आहे. यावर्षी बाजारात लाल केशरी चिक्कीचा गूळ आणि केमिकल विरहित गुळ तसेच चहाचा गूळ व मोदक आणि गुळपट्टी आदींनी दुकाने सजली आहेत. तीळ आणि गुळाचा सुगंध बाजारपेठेत भरून राहतो, ज्यामुळे उत्सवाचे वातावरण निर्माण होत आहे. थंड हवामानात तीळ आणि गुळाचा सुगंध लोकांना आकर्षित करत आहे. थंड वाऱ्यात तीळ-गुळाची दुकाने लोकांना बाजारात आकर्षित करत आहे. अकोला शहरातील विविध मिठायांच्या दुकानात दुकानात तसेच शहरातील धान्य बाजारात तीळ-गुळाच्या मिठाई विकल्या जात आहेत. एका तीळ-गुळ विक्रेत्याने सांगितले की यावर्षी तिळगुळासाठी आवश्यक चिक्कीचा गुळ ५५ रुपये प्रति किलोने विकला जात आहे तर चांगला तीळ दीडशे रुपयांपासून १७० रुपये किलोने विकला जात आहे दुकानदारांचे म्हणणे आहे की संक्रांतीचा सण जवळ येताच तिळगुळ आणि इतर मिठाई यांची मागणी वाढेल दोन प्रकारचे तीळ विक्रीसाठी बाजारात आणण्यात आले आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे की मकर संक्रांतीचा सण अजून १६ दिवसांवर आला असताना अकोला शहरातील बाजारपेठांमध्ये उत्सवाचा उत्साह दिसू लागला आहे. संक्रांतीच्या आधीच शहरातील चौकांमध्ये आणि मुख्य बाजारपेठेत तीळ आणि गूळ विकले जात आहेत.

### अकोल्यात काँग्रेस- शरद पवार गटाची युती

**अकोला :** मनपा निवडणुकीसाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांनी युतीची अधिकृत घोषणा केली आहे. मात्र, ठाकरे गट स्वतंत्र लढणार की आघाडीत राहणार, याबाबत अद्याप संभ्रम कायम आहे. अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याने ठाकरे गटासमोर मोठे आव्हाननिर्माण झाले आहे. या सत्तासंघर्षात ठाकरे गटाची भूमिका निर्णायक ठरणार असून अकोल्याच्या राजकारणात आता चुरस वाढली आहे.

### तरुणाईनी केला संकल्प

अकोला : सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी तरुणाईने नवीन वर्षाचे संकल्पही आखले आहेत. कॉलेजसह शहरातल्या कट्ट्या कट्ट्यावर तरुणाई नववर्ष संकल्पांचे इमले बांधत होते. नव्या वर्षा मध्ये काय करायचे, याची यादीच यापैकी काहींनी तयार केली होती. हे संकल्प पूर्णत्वाला नेण्याबाबत अनेकांनी आपसात पैजासुद्धा लावल्या आणि त्यांनी केलेले संकल्प यावर्षी तरी निश्चितच पूर्ण करु अशी हमी हे मित्र-मैत्रिणी एकमेकांना देत आहे येणारे वर्ष हे आपल्या संकल्पपूर्तीचे ठरावे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना

### केवायसीसाठी अखेरचे २ दिवस

**▪अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र लाभार्थीमहिलांची पडताळणी आणि केवायसीच्या आधार प्रमाणीकरण करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत असून, ती तत्काळ पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत किंवा घटस्फोट झालेला आहे त्या लाभार्थी महिलांनी स्वतःचे ई केवायसी करून पती अथवा वडील यांचे मृत्यू प्रमाणपत्र किंवा घटस्फोटीतांनी घटस्फोट प्रमाणपत्र किंवा मा.




न्यायालयाचे आदेश याची सत्यप्रत संबंधित अंगणवाडी सेविका यांच्याकडे ३१ डिसेंबरपर्यंत जमा करावी. अंगणवाडी नसल्यास बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे अर्जासह कागदपत्रे देऊन शिफारस घ्यावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले आहे.

# आज उडणार नामांकनासाठी प्रमुख उमेदवारांची झुंबड

**▪अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** महानगरपालिका निवडणुकीसाठी नामांकन प्रक्रियेला आता खूपच कमी वेळ शिल्लक आहे.

मंगळवारी दुपारी २ वाजता नामांकन दाखल करण्याची अंतिम तारीख आहे. त्यामुळे नामांकन दाखल करण्यासाठी फक्त नऊ तास शिल्लक आहेत, निवडणुकीच्या नामनिर्देशन प्रक्रियेच्या पाचव्या दिवशी शनिवारी एकूण १२ उमेदवारी अर्ज दाखल झाले. यापैकी महानगर विकास समितीकडून सात नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाली असून त्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष व माजी नगरसेवक जयंत मसने तसेच माजी उपमहापौर सुनील मेश्राम यांचाही समावेश होता. आज आणि उद्या सर्व प्रमुख उमेदवार नामांकन केंद्रांवर मोठ्या संख्येने गर्दी करतील.

हे शेवटचे दोन दिवस सर्वांत धावपळीचे असतील, ज्यामुळे उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांमध्ये वाढलेली हालचाल दिसून येईल. महानगरपालिकेच्या महासंग्रामासाठी प्रमुख पक्षांमधील युतीबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही, ज्यामुळे अनेक इच्छुकांसाठी संभाव्य जय- पराजयाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राजकीय वतुळ्ात चर्चा सुरू आहेत, शेवटच्या क्षणापर्यंत अटकळ सुरू आहे. महानगरपालिका निवडणूक प्रशासनाने सोमवारी सकाळी ११ ते दुपारी तीन आणि मंगळवारी दुपारी दोन वाजेपर्यंत नामांकन पत्रे स्वीकारली जातील अशी माहिती दिली आहे अंतिम मुदतीमुळे उमेदवारांना निर्धारित वेळेत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे जसे जसे घड्याळाचे काटे पुढे सरकत आहेत तसा तसा निवडणुकीचा उत्साह शिगेला पोहोचत असल्याचे दिसून येत आहे सर्व प्रमुख उमेदवारांनी अद्याप त्यांचे अर्ज दाखल केलेले नसल्याने शेवटच्या क्षणी प्रमुख उमेदवारांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे एकूणच सर्व इच्छुक उमेदवारांची घाल मेल आणि धाकधूक चांगलीच वाढली आहे.

# अकोला शहरात लोकशाहीचा उत्सव प्रारंभ

**▪अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने लोकशाहीचा जागर सुरू झाला आहे. प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावून शहराच्या विकासात सहभागी व्हावे, या उदात्त हेतूने मनपा प्रशासनाने शहरात ठिकठिकाणी व्यापक जनजागृती मोहीम राबवली आहे. 'माझे मत माझी जबाबदारी' असा संदेश देत आज शहरातील ऑटो आणि प्रमुख चौकांमधील दुभाजकांवर आकर्षक स्टीकर्स लावून नागरिकांना मतदानाचे आवाहन करण्यात आले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या प्रेरणेतून आणि अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. अकोलेकरांनी केवळ मतदार न राहता 'जागरूक नागरिक' म्हणून राष्ट्रीय कर्तव्यात सहभागी व्हावे, हा या मोहिमेचा मुख्यउद्देश आहे शहरातील वर्दळीची ठिकाणे जसे की, नवीन बस स्थानक, अशोक वाटिका चौक, दुर्गा चौक, गांधी रोड आणि नेहरू पार्क चौक या परिसरातील ऑटोवर प्रेरणादायी घोषवाक्ये लावण्यात आली आहेत. अशासंदेशांमुळे मतदानाविषयी सकारात्म



क नागरिकांमध्ये वातावरण निर्माण होत आहे. या मोहिमेत मनपा शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी हरिश्चंद्र इटकर, संजय खराटे, हबीब शाहिदी, मो. अनवार हुसैन, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा, प्रशांत राजुरकर, यशवंत दुधांडे, अब्दुल शफीक, आकाश बागडे, किशोर गुजर, गौरव श्रीवास, शैलेश पवार यांसह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून जनजागृती केली.अकोला

### संक्रांति निमित्त विशेष प्रदर्शनाचे आयोजन

**अकोला:** स्थानिक माहेश्वरी महिला मंडळ अकोला व दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या संयुक्त विद्यमाने माहेश्वरी भवन, न्यू राधाकिसन प्लॉट अकोला येथे दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी संक्रांति निमित्त विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे . सकाळी ११ ते रात्री ९ पर्यंत प्रदर्शनात दिव्यांग सोशल फाउंडेशन चा विशेष पूजा साहित्य स्टॉल उपलब्ध असून दिव्यांगांना शिक्षण, रोजगार व आरोग्य देण्यासाठी अधिकाधिक नागरिकांनी प्रदर्शनाला भेट देऊन सहकार्य करावे.

## गंगा नगरात गोमांस आणि साहित्य जप्त

### विहिंप बजरंग दल कार्यकर्त्यांचा पुढाकार

**▪अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** गंगा नगर परिसरात गोमांस असल्याची माहिती विश्व हिंदू परिषद, बजरंग दल कार्यकर्त्यांना मिळाली. संबंधित ठिकाणी जाऊन पाहणी केली तेव्हा जवळपास तीनशे किलो गोमांस आढळले.

जुने शहर पोलिसांना माहिती दिली. तसेच पोलिसांनी गोमांस आणि अन्य साहित्य जप्त केले.गंगानगर परिसरात छुप्या पद्धतीने गोमांस विक्री केली जाते अशी चर्चा होती. त्यानुसार विहिंपबजरंग दल कार्यकर्ते सावध झाले.शहनिशा करण्यासाठी संबंधितठिकाणी पाहणी केली तेव्हा दोन पोत्यात मांस आढळले. तीनशे किलो मांस त्या ठिकाणी जप्त केले. पोलिसांनी आरोपी विरुद्ध कारवाई केली. पुढील तपास पोलिस करीत आहेत. शहरातील रहिवासी भागात सुरू असलेल्या प्रकाराला पायबंद बसावा अशी मागणी करण्यात येत आहे. सध्या एक ठिकाण आहे परंतु त्याला वेळीच पायबंद घातला नाही तर समस्या निर्माण होईल याकडे देखील लक्ष वेधले आहे.

### स्वस्त धान्य दुकानातील निकृष्ट धान्याची तक्रार

**अकोला :** स्वस्त धान्य दुकानातून दिले निकृष्ट दर्जाचे धान्या ऐवजी खाण्यायोग्य धान्य देण्यात यावे, अशी मागणी शहरातील नागरिकांनी केली आहे. या संदर्भात मलकापूर, गोरक्षण रोड परिसरातील रेशनकार्डधारकांनी २५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन दिले. मलकापूर व गोरक्षण रोड परिसरातील स्वस्त धान्य दुकानांमधील तांदूळ व ज्वारी निकृष्ट आहे, त्यामुळे हे धान्य बदलून खाण्यायोग्य धान्य उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. गैर प्रकाराकडे अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे आणि नागरिकांना योग्य दर्जाचे धान्य वितरित करावे अशी मागणी देखील करण्यात आली.

## क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**अकोला :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या अमरावती विभागातील मुला-मुलींच्या शासकीय निवासी शाळेमधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा तसेच क्रीडा नैपुण्य विकसित होण्यासाठी विभागांतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अमरावती विभागातील ५ जिल्ह्यातील मुला-मुलींची शासकीय निवसी शाळांचे विभागीय स्तरावरील स्नेहसंमेलन, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दि. ३० डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने स्पर्धेमध्ये अंदाजे ८०० ते ८५० विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित राहणार आहे.क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल येथे संपन्न होणार आहे, यात अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम या पाचही जिल्ह्यातील समाज कल्याण विभाग यांचा नियंत्रणातील पाचही जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळा सहभागी होणार आहेत.

# प्रहार अपंग संघटनेची आढावा बैठक संपन्न

**▪तेल्हारा,दि २९ (प्रतिनिधी) :** शासकीय विश्राम गृह तेल्हारा येथे प्रहार अपंग संघटना ची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती,आणि नवीन पद नियुक्ति चा देखील कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी प्रहार अपंग संघटना अकोला ग्रामीण जिल्हा अध्यक्ष संदीप गजानन ताथोड,यांचे प्रमुख मार्गदर्शनात अध्यक्षे मध्ये आणि प्रहार अपंग संघटना महिला तालुका अध्यक्षा ज्योती कैलास गाडेकर यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला यावेळी प्रहार अपंग संघटना तेल्हारा तालुका उपाध्यक्ष पदी इम रान खान,महिला उपाध्यक्ष पदी सौ कुसुम खंडारे यांची निवड करण्यात आली आणि रखडलेला दिव्यांग निधी वाटप ,दिव्यांग राखीव निधी अन्य



विषयावर चर्चा करून ते सोडविण्याकरिता नेहमी तत्पर राहुन दिव्यांग बांधवांचे प्रश्न अडचणी सोडवु असे पदाधिकारी यांनी सांगितले.

## शिवसेनेच्या पहिल्या फळीतील ज्येष्ठ नेते श्रीकृष्ण ढोरे यांचे निधन

### अकोल्यात शोककळा; राजकीय, सामाजिक क्षेत्रातून भावपूर्ण श्रद्धांजली

**▪अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** आयुष्यभर हिंदुत्वाच्या विचारासाठी कृती आणि लेखणीद्वारे सातत्याने कार्य करणारे, ज्येष्ठ विचारवंत, लेखक, साहित्यकार व कुशल संघटक श्रीकृष्ण ढोरे यांचे निधन झाले. त्यांच्या निधनामुळे अकोला जिल्ह्यासह संपूर्ण हिंदुत्ववादी चळवळीला मोठी हानी झाली असून सर्व स्तरांतून तीव्र शोक व्यक्त केला जात आहे. प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी श्रद्धांजली अर्पण करताना सांगितले की, हिंदुत्वासाठी अखंड झटणारे, विचार आणि कृती यांची सांगड घालणारे श्रीकृष्ण ढोरे हे



चळवळीचे आधारस्तंभ होते. त्यांच्या निधनाने हिंदुत्व चळवळीची मोठी हानी झाली आहे.भाजपा-शिवसेना युतीसाठी १९९५ पासून सक्रिय कार्य करणारे ढोरे हे अभ्यासू, उत्कृष्ट वक्ते व लेखक होते. खासदार अनूप धोत्रे यांनी शोकसंवेदना व्यक्त करताना म्हटले की, ङ्गत्यांच्या निधनाने हिंदुत्ववादी विचारसरणीला एक ज्येष्ठ मार्गदर्शक गमवावा लागला आहे. भाजपा निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांनी ढोरे यांना कुशल संघटक म्हणून गौरवले. संकटाच्या काळात हिंदुत्वासाठी खंबीरपणे उभे राहणारे नेते म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली आहे, असे ते म्हणाले. आमदार वसंत खंडेलवाल यांनी ढोरे यांना पितृतुल्य नेते संबोधत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# 'नायलॉन चायनीज मांजाची अवैधरित्या विक्री करणाऱ्या आरोपीस अकोट फाईल पोलीसांनी केली अटक'

**▪अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** दि २८/१२/२०२५ रोजी पोलीस स्टेशन अकोट फाईल अकोला भागातील शंकर नगर येथील राहणारा अभय देवानंद भोसले हा शासनाने प्रतिबंधित केलेला नायलॉन चायनीज मांजाची अवैधरित्या विक्री करीत असले बाबत गोपनीय माहीती प्राप्त झाली अशा खात्रीलायक बातमीची माहीती पो. नि. श्री. रहीम शेख यांना देवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि जनार्धन खंडेराव, पो हवा / १५०० प्रशांत इंगळे, पो हवा / २११४ हर्षल श्रीवास व पोका /२१५५ ईमरान शाह असे शंकर नगर, अकोट फाईल अकोला येथे जावुन रेड कार्यवाही केली आरोपी नामे अभय देवानंद भोसले वय १९ वर्ष रा शंकर नगर, अकोट फाईल अकोला हा नागरीकांचा व पशुपक्षांचा जिव जाण्याइतपत गंभीर दुखापत व सदोष मनुष्यवध व प्रयत्न करण्याचे उद्देशाने प्रतिबंधित नायलॉन मांजा बेकायदेशीररित्या स्वताच्या आर्थीक फायदयाकरीता विक्री करीता बाळगुन



असलेला मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचे कडुन काळया रंगाचे प्लास्टीक बंडल / रील MONO KITE FIGTHER असे लेबल असलेले एकुण ३३ नग प्रति किंमत १२०० रु. असा एकुण ३९,६०० रू. चा मुद्देमाल जप्त करून अप क्रमांक ६१६/२५ कलम ११०,२२३ भारतीय न्याय संहीता सह कलम ४,५,१५ पर्यावरण संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा नोंद करून कार्यवाही करण्यात आली आहे. गुन्हयाचा तपास पो उप नि शेख अख्तर हे करीत आहे.

प्रतिबंधित चायनीज मांजा अकोट फाईल परीसरात बेकायदेशीरपणे पतंग उडविण्याकरीता वापरला जात आहे त्यामुळे रस्त्यावर दुचाकी वाहनाने प्रवास करणा-या अनेक नागरीकांचा जीव जाईल अशा प्रकारे दुखापत झाल्या आहेत. शासनाने प्रतिबंधित केलेल्या नायलॉन मांजाचे दुष्परीणामा बाबत समाज माध्यमातुन विविध सेवा भावी संस्थामार्फत, पोलीस प्रशासनाकडुन, ईतर माध्यम यांचे कडुन जनजागृती सुरू असतांना पोलीस स्टेशन अकोट फाईल हददीत तसेच जिल्हयामध्ये मोटार सायकल चालक, पादचारी तसेच पशुपक्षी यांना सदर नायलॉन मांजा आज पावेतो झालेल्या घटनांमध्ये जिव जाण्याइतपत गंभीर दुखापती झालेल्या आहे.

### १२ व्या राज्यस्तरीय राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलनाच्या स्वागतध्यक्षपदी प्रा. प्रकाश डवले

**▪अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समग्र साहित्याचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलन आयोजन समिती अकोल्याच्या वतीने साहित्यिकांना समर्पित १२ वे राज्यस्तरीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन अकोल्यात पार पडणार आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदी शिक्षण तज्ञब प्रा. प्रकाश डवले यांची निवड करण्यात आली आहे. अकोला स्थित जानोरकर मंगल कार्यालय येथे दि. २५ व २६ जानेवारी २०२६ दरम्यान मोठया उत्साहात हे विचार साहित्य संमेल्लन पार पडणार आहे, या संमेलनाचे मुख्य मार्गदर्शक



आचार्य हरिभाऊ वेरूळकर गुरुजी राहतील तसेच यापूर्वीच संमेलनाध्यक्षपदी प्रा. विजयाताई मारोतकर (नागपूर)यांची निवड झालेली आहे, अकोल्यातील शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील सुपरिचित असे डवले एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तसेच मानव सेवा फाउंडेशन अकोलाचे अध्यक्ष प्रा. प्रकाश डवले यांची १२ व्या राज्यस्तरीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलनाच्या स्वागतध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली



# व्यावसायिक शेती तंत्रज्ञान प्रसारासाठी अकोल्यातील कृषि प्रदर्शन सर्वार्थाने दिशादर्शक: प्रधान कृषि सचिव





■अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :
शाश्वत शेती आणि संपन्न शेतकरी संकल्पना अधिक ध्रुढ करण्या सोबतच व्यावसायिक शेती तंत्रज्ञान प्रसारासाठी अकोल्यातील कृषि प्रदर्शन सर्वार्थाने दिशादर्शक ठरले असल्याचे सन्मानजनक प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे प्रधान कृषि सचिव विकास चंद्र रस्तोगी यांनी केले. कृषिक्रांतीचे प्रणेते कृषिरत्न स्व. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे १२७ व्या जयंतीनिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), अकोला आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय भव्य कृषि प्रदर्शनी ङ्गअॅग्रोटेक २०२५ चा समारोप आज सायंकाळच्या सत्रात शेतकरी बांधवांच्या प्रचंड प्रतिसादात संपन्न झाला त्यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थितांना संबोधीत करतांना ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव (कृषी) मा.श्री. विकासचंद्र रस्तोगी यांची विशेष उपस्थिती होती. डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू मा.डॉ. शरद गडाख यांची अध्यक्षस्थतेत संपन्न झालेल्या यां अतिशय भावनाप्रधान समारोपीय सत्राचे प्रसंगी जिल्हाधिकारी अकोला श्रीमती वर्षा मिना, विद्यापीठ कार्यकारी परिषद सदस्य शिवराम घोडके, यांचे सह विद्यापीठाचे संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदीरवाडे, संचालक संशोधन डॉ. शामसुंदर माने, संचालक शिक्षण डॉ. देवानंद पंचभाई, अधीष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे, अधिष्ठाता उद्यानविद्या डॉ. अरविंद सोनकांबळे, कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे, नियंत्रक राजीव कटारे, विद्यापीठ अभियंता सुनील थोटांगे, कृषी विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, प्रकल्प संचालक आत्मा डॉ. मुरली इंगळे, आटारी पुणेचे प्रधान वैज्ञानिक डॉ. शाकीर अली, सहयोगी अधिष्ठाता डॉ. ययाती तायडे, डॉ. शैलेश हरणे, डॉ. शेषराव चव्हाण, डॉ. संजय भोयर, डॉ. प्रकाश कडू, डॉ. राजेंद्र काटकर, विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. उमेश चिंचमलातपुरे आदींची मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली होती.

या समारोपीय सत्रात त्रिदिवसीय कृषी प्रदर्शनीत आपले उत्कृष्ट व प्रभावी प्रदर्शन सादर करून शेतकरी बांधवांचे प्रबोधन केल्याबद्दल सहभागी दालन धारकाना प्रशस्तीपत्र वितरीत करण्यात आलेत.

यामध्ये, शासकीय संस्था गटातून कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) महाराष्ट्र शासन यांनी प्रथम तर व्दितीय क्रमांक जिल्हा रेशीम कार्यालय अकोला आणि डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन, अकोला यांना संयुक्तपणे विभागून तर तृतीय क्रमांक महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, अकोला यांनी प्राप्त केला. तर निमशासकीय संस्था गटामध्ये जवस पैदासकार, डॉ. पंदेकृवि, नागपूर व एकात्मिक शेती पद्धती संशोधन प्रकल्प,, डॉ. पंदेकृवि, अकोला यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला. तर किटक शास्त्र विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला व वनविद्या महाविद्यालय, डॉ. पंदेकृवि, अकोला यांनी संयुक्तपणे तृतीय क्रमांक प्राप्त केला.तसेच खाजगी संस्था विभागातून अॅग्री डिव्हाईन, भारत एफ.पी.ओ.संघ, अकोला, रासी सिडसब प्रायव्हेट लिमिटेड, अकोला व निर्माण फर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड, अकोला यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केला. तर कृषि विज्ञान केंद्र गटामध्ये कृषि विज्ञान केंद्र, साकोली जिल्हा भंडारा यांनी प्रथम क्रमांक तर व्दितीय क्रमांक कृषी विज्ञान केंद्र, अकोला व कृषि विज्ञान केंद्र, सांगवी (रे) यवतमाळ यांनी संयुक्तपणे पटकावला. तर कृषी विज्ञान केंद्र, हिवरा गोंदिया यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

कृषी अभियांत्रिकी व यांत्रिकीकरण गटामध्ये कृषी स्थापत्य अभियांत्रिकी विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला, मृद व जलसंधारण अभीयांत्रिकी विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला आणि कापणी पश्चात तंत्रज्ञान व कृषी प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. तर खाजगी कृषी यांत्रिकीकरण गटामध्ये हरिओम अॅग्रो,अकोट, एएफएम अॅग्रीकल्चर, अकोट आणि पहाडे अॅग्रो, वर्धा यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.

कृषि आधारित प्रक्रिया व पूरक उद्योग गटामध्ये कृष्णा शेतकरी गट,मुर्तीजापूर,भूमी सेंद्रिय शेती उत्पादन गट, पातूर व राजेश्वरी फूड प्रॉडक्ट, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अकोला यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.पुष्प प्रदर्शनी या प्रकारात पुष्प शास्त्र व प्रांगण विभाग, डॉ. पंदेकृवि अकोला यांना तर पशुसंवर्धन प्रकारात पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग, डॉ. पंदेकृवि अकोला यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रोत्साहनपर प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आलीत.

तर विद्यापीठाची गिता म्हणून संबोधल्या जार्णाया कृषी संवादिनीची सर्वाधिक विक्री केल्याबद्दल कृषी विज्ञान केंद्र,सेलसुरा जि.वर्धा, कृषी विज्ञान केंद्र, साकोली जि.भंडारा व कृषी विज्ञान केंद्र, सोनापूर, जि.गडचिरोली यांना अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचा विशेष प्रोत्साहनपर पुरस्कार प्रदान करण्यात आलेत.तर पथ्यनाट्य या जनजागृती संदर्भातील महत्वाचे प्रकारात कृषी महाविद्यालय, अकोला यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या उल्लेखनीय कामगिरी व मोडयूलसाठी, तर कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय अकोला यांना प्रभावी पथनाट्यासाठी तसेच वनविदया महाविद्यालय अकोला यांना आकर्षक वृक्ष दिंडी व शेतकरी बांधवांच्या जिव्हाळ्याचा विषयावरील पथनाट्यासाठी प्रोत्साहनपर प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आलीत.तसेच प्रोत्साहनपर पुष्प प्रदर्शनी या प्रकारांतर्गत इयत्ता पाचवीची विद्यार्थीनी असलेल्या कु.पुर्वा प्रमोद बगळेकर हिला पिंपळाच्या पानावर साकारलेल्या अतिशय सुरेख कलाकृतीसाठी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तर पुष्प प्रदर्शनी आयोजनासाठी भरीव सहकार्य केल्याबद्दल निसर्ग नर्सरी, कान्हेरी सरप यांना ही प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. तसेच सदर कृषी प्रदर्शनाच्या आयोजना दरम्यान चोख बंदोबस्त ठेवल्याबद्दल राष्ट्रीय छात्र सेना युनिट व उत्कृष्ट वैद्यकीय सेवा पुरविल्या बद्दल विद्यापीठाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.गोपाल दाभाडकर व त्यांच्या अधिनस्त कर्मचारी वृंदाना प्रदान करण्यात आले.

त्याचप्रमाणे अॅग्रोटेक - २०२५ या कृषी प्रदर्शनाम ध्ये उत्कृष्ट छायाचित्रण सेवा दिल्या बद्दल श्री. योगेश मानकर यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

तत्पूर्वी, आज दुपारच्या सत्रात संपन्न झालेल्या चर्चासत्र व शेतकरी प्रबोधन कार्यक्रमांमध्ये कापणी पश्चात तंत्रज्ञान या महत्त्वपूर्ण विषयावर डॉ. प्रमोद बकाने, कृषी अभियंता, कापणी पश्चात तंत्रज्ञान विभाग, कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, डॉ.पंदेकृवि,अकोला, शाश्वत ग्रामविकासासाठी दुग्ध व्यवसाय या शेतकऱ्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याच्या व महत्त्वाच्या विषयावर डॉ. राजेश्वर शेळके, प्राध्यापक पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, कापूस पिकाची अति घनता लागवड या नाविन्यपूर्ण विषयावर डॉ. संजय काकडे, सहयोगी प्राध्यापक, कापूस संशोधन केंद्र, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला व पौष्टिक तृणधान्य प्रक्रिया उद्योग या मूल्यवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या विषयावर डॉ. संतोष दिवेकर, सहयोगी प्राध्यापक , कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय डॉ.पंदेकृवि, अकोला यांनी तसेच आंबा घन लागवड पद्धती या विषयावर डॉ. उज्वल राऊत, सहयोगी प्राध्यापक, फळशास्त्र विभाग, डॉ.पंदेकृवि, अकोला यांनी शेतकरी बांधवांचे प्रबोधन केले. दरम्यान आज प्रदर्शानीच्या तिसऱ्या व शेवटच्या दिवशीही शेतकरी बंधू भगिनींनी अलोट गर्दी करीत प्रगत शेती तंत्र जाणून घेतले.

## शिर्ला ग्रामपंचायतीतील शासकीय कामांमध्ये भ्रष्टाचार व अनियमिततेचे आरोप



शिर्ला ग्रामपंचायत अंतर्गत करण्यात आलेल्या विविध शासकीय कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व अनियमितता झाल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. या संदर्भात शिर्ला येथील रहिवासी शेख शकील शेख बशीर यांच्यासह इतर नागरिकांनी पंचायत समिती पातूर येथील गट विकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर करून निष्पक्ष व सखोल चौकशीची मागणी केली आहे.तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, बादशाह नगर येथील चांद अहमद मशिदीसमोर ७८ फूट रस्त्याच्या बांधकामासाठी ५,२४,५४०/- इतका खर्च दाखविण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात रस्त्याचे काम अपूर्ण असून अत्यंत निकृष्टदर्जाचे आहे. त्यामुळे नागरिकांनी सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून खर्चाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.याचप्रमाणे शिर्ला ग्रामपंचायत क्षेत्रातील रेणुका नगर व ज्येष्ठ नागरिक संघ येथे प्रत्येकी एका बोरिंगसाठी २ लाखांपेक्षा अधिक खर्च दाखविण्यात आला असून त्यामध्ये भ्रष्टाचाराची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तक्रार पत्रात असेही नमूद करण्यात आले आहे की, शिर्ला येथीलच बादशाह नगर, समी प्लॉट, दुल्हा प्लॉट, जमदार प्लॉट या भागांना जाणीवपूर्वक बोरिंग योजनेपासून वंचित ठेवण्यात आले आहे, तर या परिसरात तीव्र पाणीटंचाई आहे.स्वच्छतेच्या नावाखाली केवळ कागदी कारवाई, प्रत्यक्षात शून्य कामस्वच्छता कामांबाबतही गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तक्रारीनुसार, प्रत्यक्षात स्वच्छतेची कामे नगण्य असतानाही लाखो रुपयांची बिले काढण्यात आली आहेत.

## राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

**अकोला :** नियोजन भवन येथे राष्ट्रीय ग्राहक दिन आज साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी वर्षा मीना कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.डिजिटल न्यायाद्वारे ग्राहक तक्रारींचे कार्यक्षम आणि वेगवान निवारण या विषयावर केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार मार्गदर्शन व जनजागृती यावेळी करण्यात आली. जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी,जिल्हा पुरवठा अधिकारी रविंद्र यन्नावार, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अर्चना निमजे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमास जिल्हा पुरवठा कार्यालय अकोला व तहसील अकोला येथील अधिकारी, कर्मचारी व मोठ्या प्रमाणावर ग्राहक उपस्थित होते. संजय पाठक, कैलास बगडे यांनी ग्राहकांच्या हक्काबाबत ग्राहकांना मार्गदर्शन केले. जिल्हा ग्राहक मंच अकोलाचे अध्यक्ष श्री. कुलकर्णी यांनी यावेळी ङ्गडिजिटल न्यायाद्वारे ग्राहक तक्रारींचे कार्यक्षम आणि वेगवान निवारण या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी कलापथकाचा तसेच पथनाटय यांच्याद्वारे प्रबोधनत्मक कार्यक्रमही झाला. कार्यक्रमस्थळी बीएसएनएल, महावितरण, आयओएसएल, बीपीसीएलजी एचपीसीएल,, गॅस कंपनी, वैधमापन विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग, अन्न व औषध प्रशासन अकोला, शासकीय महाविदयालय तसेच जिल्हा आरोग्य विभागाचे मुख्य समन्वयक अकोला यांनी आवश्यक साहित्य, फोटो इत्यादीची प्रदर्शनी लावून राष्ट्रीय ग्राहक दिनाचे म हत्व ग्राहकांना समजावून सांगितले.

## आता वेध पतंगीचे

■अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :
डिसेंबर महिन्यात शाळा-शाळांमध्ये स्नेहसंमेलन पार पडले आणि या दिवसामध्ये अभ्यासाला सुटी मिळाली. विद्यार्थ्यांना अभ्यासापेक्षा खरे तर खेळणे बागडणे आवडते. आता जानेवारी महिना सुरु होण्यास दोनच दिवस शिल्लक आहेत आणि विद्यार्थ्यांना पतंग उडविण्याचे वेध लागले आहे. शाळा सुटल्यावर दररोज पतंग उडविण्याची प्रॅक्टिस आतापासून बच्चे कंपनी करताना दिसून येत आहे. घराच्या टेरेसवर आता शाळकरी मुलांचे ग्रुपच्या ग्रुप पतंग उडविताना दिसत आहे. संक्रांती सणाच्या दिवशी आपलाच पतंग आकाशात उंच झेपावणार असा मानसही बच्चे व्यक्त करत आहे आणि पतंगीच्या दुकानातून पतंग खरेदीसाठी आपल्या पालकांकडे आग्रह करीत असल्याचे चित्र महानगरात पाहावयास मिळत आहे.

## प्रभातमध्ये डॉ.होमीभाभा बालवैज्ञानिक प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवासी शिबिर संपन्न



■अकोला,दि २९ (प्रतिनिधी) :
अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या दुर्सया टप्प्यावरील प्रत्यक्ष परीक्षेची तयारी करून घेणारे निवासी शिबिर प्रभात किड्समध्ये नुकतेच संपन्न झाले. अकोला, छत्रपती संभाजीनगर व सोलापूर येथील विद्यार्थ्यांनी या शिबिरामध्ये सहभाग नोंदविला. शिबिराचे उद्घाटन प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, तज्ज्ञ मार्गदर्शक प्रदीप सोमाणी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून सुधीर आवटी, डॉ. टोक्शा, डॉ. त्रिशूल कुळकर्णी, सौ. ज्योत्स्ना, कोमल कापसे, शुभांगी व्यवहारे, शुभम डांगे, पुजा ठाकुर उपस्थित होते. त्यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर सर्व शिबिरार्थिंनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवनशास्त्र या तीनही विषयांची संबंधित प्रयोग स्वतः करून पाहिले. प्रभातच्या भव्य अशा लॅबस्मध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मदतीने हे सर्व प्रयोग करण्यात आले. या निवासी शिबिरामुळे एक वेगळा आत्मविश्वास निर्माण झाल्याचे शिबिरार्थिंनी सांगितले. यावेळी समारोप समारंभात पालकांनी देखील आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक प्रदीप सोमाणी, प्राचार्य वृषाली वाघमारे, समन्वयक व्ही. अनुराधा यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. ह्या निवासी शिबिरामुळे एक नवी वैज्ञानिक दृष्टी तयार झाल्याचे सर्व उपस्थितांचे मत होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रभात परिवारातील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

सामाजिक न्याय विभागातर्फे शासकीय निवासी शाळांच्या विद्यार्थ्यांचे विभागीय स्नेहसंमेलन, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी अकोला येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे होणार आहे.

**Change In Name**
I have change my name From
**SHIVARAJ NANDU KHANDALKAR**
(Wrong Name)
To
**SHIVRAJ NANDKISHOR KHANDALKAR**
(New Name as per on Two Photo ID)
My Residential Address is- Gourakshan Road, Opp. Gajanan Floor Mill, Sahakar Nagar, VTC-Akola, Dist: Akola, State: Maharashtra
Pin Code: 444004
(Address as per on Two Photo ID)

## हास्याचे निखारे पेटवणारा विनोदाचा सम्राट अस्तंगत!

### 'बटूमूर्ती' माधवराव ठाकूर काळाच्या पडद्याआड; रंगभूमीवर शोककळा

■मुर्तिजापुर,दि २९ (प्रतिनिधी) :
महाराष्ट्राच्या लोककलेच्या रंगमंचावर चार दशके हास्याचा निखारा पेटवणारे, रसिकांच्या मनावर विनोदाचा सम्राट म्हणून अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ लोकनाट्य कलावंत माधवराव गुणवंत ठाकूर यांचे रविवारी (दि. २८ डिसेंबर) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या जाण्याने लोकनाट्याचा कणा मोडला असून हास्याचा रंगमंच आज अक्षरशः सुना झाला आहे.

मूर्तिजापूर तालुक्यातील सिरसो येथील रहिवासी असलेले माधवराव तायडे (ठाकूर) यांनी तमाशातून कारकीर्दीस सुरुवात करून लोकनाट्याच्या सोंगाड्या भूमिकेला नवी उंची दिली. केवळ अडीच फुट उंची असलेल्या या 'बटूमूर्ती' कलाकाराने आपल्या अंगभूत अभिनयकौशल्याने, टपोरी संवादफेक व धारदार विनोदाने संपूर्ण महाराष्ट्र हसवत



ठेवला.कमलाबाई जळगावकर लोकनाट्य मंडळ, तसेच आनंद लोकनाट्य मंडळ, जळगाव यांसारख्या नामांकित संस्थांमधून त्यांनी केलेला अभिनय रसिकांच्या मनावर कोरला गेला.विनोदाच्या प्रत्येक फटक्यातून समाजचित्र उभे करणारे माधवराव हे केवळ कलाकार नव्हते, तर लोककलेचा जिवंत श्वास होते. प्रकृतीच्या तक्रारींमुळे कालांतराने रंगमंचापासून दूर जावे लागले. काही महिन्यांपासून अंथरुणाला खिळलेले असताना रविवारी त्यांनी सिरसो येथील राहत्या घरी वयाच्या ८९ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला.त्यांच्या निधनाने लोकनाट्यविश्वावर शोककळा पसरली असून कलाकार, रसिक व लोककला प्रेमींमधून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सूना व नातवंडे असा आप्तपरिवार आहे.हास्याने जखमा भरून काढणारा हा बादशाह आज आठवणींच्या रंगमंचावर अजरामर झाला आहे.

## शेतातील कापूस चोरी करणारी टोळी, ग्रामीण पोलिसांकडून गजआड

■अकोट,दि २९ (प्रतिनिधी) :
ऑपरेशन प्रहार अंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी शेतातून कापूस चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक करून मोठी कारवाई केली आहे. ही कारवाई २८ डिसेंबरला रात्री करण्यात आली. पोलिस स्टेशन ग्रामीणचे रात्रपाळी अधिकारी पो. हवालदार वासुदेव ठोसरे हे दर्यापूर रोडवरील अकोट भाग-२ बी परिसरात गस्त घालत असताना दुचाकीवर कापसाची गाठोडी घेऊन जाणारे दोन संशयित इसम आढळले. त्यांना थांबण्याचा इशारा दिला असता त्यांनी तो न जुमानता पळ काढण्याचा प्रयत्न केला. संशय बळावल्याने पोलिसांनी त्यांना थांबवून चौकशी केली. त्यांनी आपली नावे दीपक सुरेश गवते (२०) व राजेश पन्नालाल कासदेकर (२३) रा. चिपी गायराण, ता. तेल्हारा, जि. अकोला अशी सांगितली.रात्री उशिरा अकोट-अम रावती रोडवर कापसाची गाठोडी घेऊन जाण्याबाबत समाधानकारक उत्तरे न दिल्याने पोलिसांना खात्री झाली की, सदर कापूस चोरीचा आहे. त्यानुसार दोन्ही संशयितांना चौकशीसाठी पोलीस ठाणे अकोट ग्रामीण येथे आणण्यात आले.दरम्यान, अब्दुल सलीम अब्दुल रफिक ( वय २८), रा. सोमवार बेस, खतीब पुरा, अकोट हे शेतकरी सकाळी पोलीस ठाण्यात हजर होऊन त्यांच्या शेतातून अज्ञात इसमांनीकापूस चोरी केल्याची तक्रार दिली. पोलीस ठाण्यात उभी असलेली दुचाकी क्र. एमएच ३० टी ४५०० व त्यावरील कापसाची गाठोडी पाहून त्यांनी खात्री केली की, हाच कापूस त्यांच्या शेतातून चोरीला गेला.

## निधन वार्ता

### शिवानंद शिंदे



**अकोला :** अकोली खुर्दचे म ाजी सरपंच शिवानंद आकाराम शिंदे यांचे वृद्धापकाळामुळे रविवारी सायंकाळी निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. सोमवारी गीता नगर मोक्षधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. श्री रा.ल.तो विज्ञान महाविद्यालयातील विजय शिंदे यांचे ते वडील होत.

RNI NO-46973/1986
Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८
महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मेला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची आज पुण्यतिथी आहे. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते.

-------------



विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते.

विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला.

अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली.

१९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लॉंच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन (चुंबकीय भूमध्य रेखा) च्या अगदी जवळ होते. पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती. पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली. त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले.

भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लॉंचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले.

विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ.

भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे (रॉकेट) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले.

दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ. विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची (इसरो) ची स्थापना झाली.

आयआयएम अहमदाबादच्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे.

डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे.

विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

■ ■ ■

# राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन

दरवर्षी ३० डिसेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय संकल्प नियोजन दिवस हा केवळ वैयक्तिक उद्दिष्टे ठरवण्यापुरता मर्यादित नसून, तो समाजाच्या एकूण वाटचालीचा आत्मपरीक्षणाचा आणि पुनर्नियोजनाचा दिवस आहे. वर्षाच्या शेवटी उभे राहून मागील काळाचा आढावा घेणे, आपल्या यश-अपयशांचे प्रामाणिक मूल्यमापन करणे आणि येणाऱ्या काळासाठी ठोस, वास्तववादी व सामाजिकदृष्ट्या उपयुक्त संकल्प ठरवणे, ही या दिवसाची खरी प्रेरणा आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, संकल्प नियोजन ही प्रक्रिया व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध अधिक दृढ करणारी आहे. व्यक्तीचे संकल्प हे वैयक्तिक असले तरी त्यांचे परिणाम कुटुंब, समुदाय, संस्था व संपूर्ण समाजावर उमटत असतात.

-------------

मानवी जीवन हे केवळ प्रवाहासोबत वाहत जाण्याचे नाव नाही; तर ते जाणीवपूर्वक दिशा देण्याची कला आहे. ही दिशा देण्यासाठी संकल्प आवश्यक असतात. समाजशास्त्र सांगते, कोणताही समाज प्रगतीच्या दिशेने तेव्हाच वाटचाल करतो, जेव्हा त्या समाजातील बहुसंख्य व्यक्तींच्या ध्येयांमध्ये सुसंगती असते.

राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा त्या सुसंगतीचा विचार करण्याची संधी देतो. वैयक्तिक संकल्प आणि सामाजिक गरजा यांचा समन्वय साधला गेला, तर संकल्प हे केवळ शब्द न राहता सामाजिक परिवर्तनाची साधने बनतात.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**९९६०१०३५८२**
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि ताणतणावपूर्ण जीवनात अनेकदा संकल्प क्षणिक भावनेतून घेतले जातात. वर्षाच्या सुरुवातीला उत्साहाने ठरवलेले संकल्प काही आठवड्यांतच विसरले जातात.

समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की, संकल्प अपयशी ठरण्यामागे केवळ इच्छाशक्तीचा अभाव नसतो, तर सामाजिक-सांस्कृतिक अडथळे, आर्थिक मयार्दा, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि संस्थात्मक दबाव यांचाही मोठा वाटा असतो. त्यामुळे राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा केवळ काय ठरवायचे? एवढाच प्रश्न विचारत नाही, तर कसे ठरवायचे?, कोणत्या परिस्थितीत ठरवायचे? आणि त्या संकल्पांची अंमलबजावणी कशी करायची? याचाही सखोल विचार करायला भाग पाडतो.

संकल्प नियोजन ही मूलतः सामाजिक प्रक्रिया आहे. व्यक्ती आपल्या अनुभवांमधून, सामाजिक संवादातून आणि सांस्कृतिक मूल्यांमधून संकल्प घडवत असते.

उदाहरणार्थ, शिक्षण घेण्याचा संकल्प हा केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नसून तो कुटुंबाच्या सामाजिक प्रतिष्ठेशी, रोजगाराच्या संधींशी आणि राष्ट्राच्या मानवी भांडवलाशी जोडलेला असतो. त्याचप्रमाणे आरोग्य जपण्याचा संकल्प हा केवळ स्वतःपुरता मर्यादित न राहता, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील ताण कमी करणारा ठरतो. त्यामुळे संकल्प नियोजन करताना मीच्या पलीकडे जाऊन आपणचा विचार करणे ही काळाची गरज आहे.

भारतीय समाजरचनेत संकल्पांची परंपरा प्राचीन काळापासून आढळते. व्रत, प्रतिज्ञा, संकल्पना यांचा उल्लेख धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. मात्र आधुनिक काळात या संकल्पांना वैज्ञानिक नियोजनाची जोड देणे आवश्यक आहे.

समाजशास्त्र हे सांगते की, कोणताही संकल्प टिकून राहण्यासाठी तो वास्तववादी असणे, सामाजिक समर्थन मिळणे आणि त्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा या तीनही घटकांचा समतोल साधण्याची प्रेरणा देतो.

आज भारतासमोर असंख्य सामाजिक आव्हाने उभी आहेत, दारिद्रय, बेरोजगारी, शिक्षणातील विषमता, लैंगिक असमानता, पर्यावरणीय ऱ्हास, आरोग्य समस्या, सामाजिक तणाव इत्यादी. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय संकल्प नियोजन दिनाचे महत्त्व अधिकच वाढते.

जर प्रत्येक नागरिकाने आपल्या वैयक्तिक संकल्पांमध्ये सामाजिक जबाबदारीचा समावेश केला, तर सूक्ष्म पातळीवर होणारे बदल व्यापक सामाजिक परिवर्तनाला चालना देऊ शकतात. उदाहरणार्थ, पर्यावरण संवर्धनाचा संकल्प घेणारी व्यक्ती केवळ स्वतःसाठी नाही, तर पुढील पिढ्यांसाठीही शाश्वत भवितव्य घडवण्यास हातभार लावत असते.

संकल्प नियोजन हे केवळ उद्दिष्ट ठरवण्यापुरते मर्यादित नसून, ते आत्मशिस्त, सातत्य आणि सामूहिक सहभाग यांची मागणी करते. समाजशास्त्रीय अभ्यासानुसार, ज्या समाजात सामूहिक संकल्पांची संस्कृती बळकट असते, त्या समाजात सामाजिक ऐक्य आणि सहकार्य अधिक दृढ असते.

राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा अशा सामूहिक संकल्पांची बीजे रोवण्याचा दिवस ठरू शकतो. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि माध्यमे यांनी या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करून समाजात सकारात्मक चचेर्ला चालना दिली, तर संकल्प नियोजन ही केवळ वैयक्तिक कृती न राहता सामाजिक चळवळ बनू शकते.

आजच्या डिजिटल युगात संकल्प नियोजनाला नवे परिमाण प्राप्त झाले आहे. सोशल मीडिया, ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स आणि डिजिटल साधनांच्या माध्यमातून लोक आपले संकल्प जाहीर करतात, त्यांची प्रगती शेअर करतात आणि इतरांकडून प्रेरणा घेतात.

मात्र समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, या प्रक्रियेत दिखाऊपणा आणि वास्तव यातील फरक ओळखणे आवश्यक ठरते. संकल्प हे दाखवण्यासाठी नव्हे, तर जगण्यासाठी असावेत, ही जाणीव राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन अधोरेखित करतो.

संकल्प अपयशी ठरणे हीही सामाजिक शिकवण असू शकते. अपयशातून शिकणे, आपल्या मर्यादा ओळखणे आणि नव्या पद्धतीने प्रयत्न करणे, ही प्रक्रिया व्यक्तीला अधिक प्रगल्भ बनवते. समाजशास्त्र सांगते की, अपयशाला कलंक न मानता शिकण्याची संधी मानणारा समाज अधिक सर्जनशील आणि प्रगतिशील असतो. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा अशा सकारात्मक दृष्टिकोनाचा प्रसार करण्याची संधी देतो.

शेवटी, राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव नसून, तो वर्षभरासाठीचा मार्गदर्शक ठरायला हवा. संकल्प म्हणजे भविष्यासाठी टाकलेले पाऊल असते आणि ते पाऊल योग्य दिशेने पडावे यासाठी नियोजन, समन्वय आणि सामाजिक भान आवश्यक असते.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, व्यक्तीचे संकल्प जेव्हा सामाजिक हिताशी जोडले जातात, तेव्हाच त्यांचे खरे मूल्य प्रकट होते. म्हणूनच ३० डिसेंबर हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षणाची, पुनर्विचाराची आणि नव्या आशेने पुढे जाण्याची प्रेरणा देणारा ठरतो.

आजच्या बदलत्या काळात, जेव्हा अनिश्चितता आणि अस्थिरता वाढलेली आहे, तेव्हा संकल्प नियोजन हीच स्थैर्याची किल्ली ठरू शकते.

राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन आपल्याला हेच सांगतो की, भविष्य हे आपोआप घडत नाही; ते घडवावे लागते, जाणीवपूर्वक, नियोजनपूर्वक आणि सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून. अशा संकल्पशील समाजातूनच सुदृढ, समतावादी आणि प्रगत राष्ट्राची निर्मिती होऊ शकते.

# विद्यार्थ्यांची पिढी घडविणारे आंतरराष्ट्रीय कुलगुरू



**माणूसपणाची पाऊलवाट**
**सुजाता बंडावार**

साने गुरुजी प्रेरित राष्ट्रीय सेवा दलाच्या पुरोगामी विचारांनी प्रभावित झालेले प्रा. राजाराम वट्टमवार शैक्षणिक क्षेत्रात काम करीत असताना सत्ता संघर्षापासून सदैव दूर राहिले. पण रक्तात भिनलेली सेवा प्रवृत्ती विचार विकास मंदिर सार्वजनिक वाचनालय आणि बाबा आमटे यांच्या श्रमसंस्कार शिबिरातून फुलत गेली आणि त्यांच्या हातून अनेक विद्यार्थी आजतागायत घडले आहेत.

महाराष्ट्रातील बळेगाव या छोट्याशा गावी रुक्मिणीबाई वट्टमवार आणि विठ्ठल वट्टमवार यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. वडील लहानपणीच वारल्याने त्यांचे बालपण आर्थिक विवंचनेतच गेले. पण काहीही करून शिक्षण पूर्ण करायचेच, हे त्यांचे स्वप्न होते. या स्वप्नांना प्रयत्नांची पंख देत त्यांनी गावात चौथीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

गोसावी समाजाचे लक्ष्मण हिराभारती व डॉ. गणेश गुंडावार यांच्या आर्थिक मदतीतून व प्रोत्साहनातून त्यांनी अकरावी मल्टीपर्पजपर्यंतचे शिक्षण नांदेड येथे पूर्ण केले. त्यांना आयुर्वेदिक महाविद्यालयात जाण्याची संधी होती, पण त्यांनी शिक्षकी पेशा स्वीकारला. पुढे एम.ए.चे शिक्षण घेत समाजशास्त्र विभागाचे विभागप्रमुख म्हणून ते प्रतिभा निकेतन महाविद्यालयात रुजू झाले.

प्राध्यापकी करीत असताना स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पुढाकारातून आणि नरहर कुरुंदकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनातून त्यांनी विचार विकास मंदिर सार्वजनिक वाचनालयाची जबाबदारी स्वीकारली. अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी उभे केलेले हे वाचनालय कार्यकर्त्यांच्या अभावी बंद पडले होते.

या वाचनालयाला पुनरुज्जीवन देण्याचे कार्य त्यांनी मोठ्या कष्टाने केले. या वाचनालयाचे वैशिष्ट्य म्हणजे येथील पुस्तकांची देवाणघेवाण ही नावांची नोंदणी न करता होते आणि पुस्तकेही हरवत नाहीत, असे ते मोठ्या अभिमानाने सांगतात. वीस वर्षांपासून अविरतपणे हे वाचनालय चालवून विद्यार्थ्यांमधील वैचारिक संपदा ते वाढवत आहेत.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना श्रमसंस्कारातून जीवनानुभव यावा म्हणून ते आनंदवन येथील बाबा आमटे यांच्या श्रमसंस्कार शिबिरात जुळले. येथे देशभरातून विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकासासाठी येतात. येथील एक अनुभव ते मोठ्या गमतीने सांगतात की आनंदवनामध्ये कुष्ठरोगींची सेवा करण्यासाठी आपले पूर्ण जीवन अर्पण करणा?या अरुण कदम या तरुणाचा विवाह होत नव्हता. तेव्हा साधनाताई आमटे यांनी त्यांच्या विवाहाची जबाबदारी माझ्यावर सोपविली आणि ती जबाबदारी मी मोठ्या कुशलतेने पार पाडली.

असाच एक प्रसंग ते सांगतात की बाभुळगावच्या विद्यार्थ्यांनी श्रमसंस्कार शिबिर घेण्याची विनंती मला केली होती. पण येथील स्थानिकांनी गावात विजेची अडचण असल्याची माहिती दिली. ते म्हणतात की मी लगेच येथील एक्झिक्युटिव्ह इंजिनियरला भेटलो. तर त्याने आव्हानच दिले की या गावात वीज आणून तर दाखवा. मी हे आव्हान स्वीकारले आणि विद्यार्थ्यांच्या मदतीने इलेक्ट्रिक पोल गावात आणले.

त्याची दुरुस्ती केली आणि पाच दिवसांत गावात वीज आली. आजही येथील गावकरी भावुक होऊन म्हणतात की तुमच्यामुळे गावात वीज आली, शेतात पाणी आले आणि मोटारी बसल्या. या अनुभवांना वट्टमवार यांनी शब्दांची जोड देत लाईट इन अ विक हे पुस्तक प्रकाशित केले.

पीपल्स हायस्कूलमध्ये शिक्षक असताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारच्या स्पर्धा राबविल्या. ज्याची दखल नांदेड जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी घेतली आणि परिपत्रक काढून इतर शिक्षकांना त्यांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करण्याचा आदेश दिला.

आपण समाजाचं काही देणं लागतो आणि त्याची परतफेड झाली पाहिजे, याच भावनेने त्यांनी वाचनालय, श्रमसंस्कार शिबिरे, शाळा आणि महाविद्यालयात भरीव शैक्षणिक योगदान दिले.

याचीच गोड फळे म्हणजे त्यांच्या हातून डॉक्टर देशमुख, संभा चौरे, क्षितिज कांबळे, डॉक्टर नरवाडे यांसारखे आपापल्या क्षेत्रात उच्च पदावर असणारे विद्यार्थी घडले. महाविद्यालयातील विद्यार्थिनी प्राध्यापिका कल्पना या डीवायएसपी झाल्या होत्या, पण त्यांनी प्राध्यापिकेचा मार्ग स्वीकारला.

शैक्षणिक योगदान देत असताना त्यांनी विपुल लेखन केले आहे. याला जीवन असे नाव या पुस्तकाची ते विशेष आठवण करतात. याशिवाय शंकरराव चव्हाण, कर्मयोगी बाबा आमटे, महात्मा गांधी यांच्यावर त्यांनी पुस्तके लिहिली आहेत. तसेच अनेक कथा, कविता व कादंबऱ्याही त्यांनी लिहिल्या आहेत. काशी येथील एका बोगद्यात ४१ कामगार अडकून पडले होते. त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी ऑस्ट्रेलियाचे इंजिनियर व केंद्र सरकारच्या प्रयत्नांतून प्राण वाचविण्यात आले.

या अनुभवावर आधारित वट्टमवार यांनी लिहिलेल्या कवितेचे गुणगान करणारे पत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांना लिहिले होते. ही आठवण ते मोठ्या अभिमानाने सांगतात. याशिवाय अखिल भारतीय बालसाहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.

सदैव खादीचा अंगीकार करणारे ८४ वर्षीय राजाराम वट्टमवार पुरोगामी विचारांच्या चळवळीत सदैव अग्रेसर असतात. प्रार्थनेने आपल्या दिवसाची सुरुवात करणारे वट्टमवार कमालीचे शिस्तप्रिय असल्याने ते कधीच कुठे उशिरा पोहोचले नाहीत. आणि एका तत्त्वाचे त्यांनी आयुष्यभर पालन केले, ते म्हणजे सत्ता संघर्षापासून दूर राहणे.

आयुष्य सुखी व समाधानाने जगायचे असेल तर विसरा आणि क्षमा करा या वाक्याचा पाठपुरावा करा, असा संदेश ते वृत्तपत्रांच्या माध्यमातून देतात. राजाराम वट्टमवार सर यांची ग्रंथालय चळवळ गावागावत गेली, त्यांचे विद्यार्थी जगाच्या कानाकोपऱ्यात जावून पोहोचले आहेत, महाराष्ट्रातील दुसरे साने गुरूजी म्हणून राजाराम वट्टमवार सर यांची ओळख आहे. साधी राहणी, उच्च विचार असणाऱ्या या ध्येयवेड्या समाजसेवकाचे पुढील आयुष्य सुखकारक व आरोग्यपूर्ण जावो, अशी आमची कामना.

**: प्रा. राजाराम वट्टमवार संपर्क क्रमांक :**
**९४२०२५६८८२**

■ ■ ■

**वाचक लिहितात**

## समस्या ईशान्य भारताची

अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा आणि सिक्कीम या आठ राज्य मिळून ईशान्य भारत बनतो. सिक्कीम वगळता उरलेल्या सात राज्यांना त्यांच्या भौगोलिक सानिध्यात आणि संस्कृतिक समानतेमुळे सात बहिणी (सेवन सिस्टर) हे नाव दिले आहे तर सिक्कीमला भाऊ (ब्रदर स्टेट) संबोधले जाते.

हा भाग कायमच दुर्लक्षित राहिल्यामुळे अशांत, अस्थिर, अविकसितच आहे. प्रत्येक राज्याची वेगळी समस्या आहे. नागालँड मध्ये क्रिस्ती मिशनरी मोठ्या प्रमाणात धर्मांतरण करत आहे. मणिपूर मध्ये मूळ आदिवासी आणि घुसखोर धर्मांध यांच्यात सरळ सरळ युद्ध आहे त्यात अफू सारख्या अमली पदाथार्ची शेती आणि तस्करी होत आहे.

आसाममध्ये बांगलादेशी रोहिंग्यां ची समस्या आहे. अरुणाचल प्रदेशला चीन स्वतःचाच भाग मानतो. धर्मांतरण, जिहादी आतंकवादी, आक्रमण आणि चीन, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ हे देश ही भूमी कह्यात घेण्यासाठी सतत प्रयत्नात असतात. अरुणाचल प्रदेशमध्ये हेरगिरीचे जाळे उघड झाले. त्यात पाकिस्तानशी संबंधित हेरगिरी नेटवर्कमधील चार संशयितांना अटक केली.

हे सर्व संशयित महत्त्वाची माहिती पाकिस्तानी हॅन्डलर्स ला पाठवत होते. त्यात चीनचाही सहभाग असल्याचे लक्षात आले. काही दिवसापूर्वी भारताला ईशान्य भारताची जोडणाऱ्या 'चिकन नेक' जवळील बांगलादेशाच्या भूभागावर बांगलादेशाच्या वायुसेनेचा हवाई तळ चीन बांधून देत आहे. तर पेरूवा येथे आठ पाणबुड्यांसाठी तळ बांधत आहे. चीनने बांगलादेशाला दोन पाणबुड्या ही दिल्या आहेत. बांगलादेशाच्या वैमानिकांना पाकिस्तान प्रशिक्षित करणार आहे. त्या समवेत सैन्यालाही प्रशिक्षण देणार आहे.

सध्या बांगलादेशात हिंदू वरील अत्याचार, हल्ला, आक्रमण उफाळलेला आहे. हिंदूंचे अस्तित्व संपून टाकण्याचा प्रयत्न चीन, पाकिस्तान,बांगलादेश करत आहे. भारतातील ईशान्येकडील सात राज्ये तसेच बंगाल आणि बिहारी यांना एकत्र करून 'ग्रेटर बांगलादेश' बनविण्याचे स्वप्न ते पाहतच आहे. एकूणच ईशान्य भारतात खूप काही तरी मोठे करण्याचा कट कारस्थान चीन, पाकिस्तान,बांगलादेश कडून होत आहे.

देशाच्या सीमा तलवारीच्या टोकानेच निश्चित होतात आणि निश्चित झालेल्या सीमा बंद करणे हे राष्ट्राच्या हिताचे असते असे उद्गार काही वर्षांपूर्वी दूरदृष्टी असलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी काढले होते आणि ते किती महत्त्वाचे होते हे आज घडणाऱ्या घटनांवरून लक्षात येते. अरुणाचल प्रदेशातील भारत विरोधी कारवाया पहाता चीनसह बांगलादेश आणि पाकिस्तान यांना चेतावणी देणे आवश्यक आहे आणि पुढे जाऊन गरज पडली तर कठोर कारवाई करणे देखील आवश्यक आहे. हिंदूंवरील अत्याचार, त्यांचा होणारा विध्वंस रोखण्यासाठी देशात हिंदू राष्ट्र आणणे हे सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

■ **लीना मकरंद गाडगीळ**
**पनवेल.**

## १ जानेवारीला जागतिक वर्षारंभ म्हणावे का ?

ज्यू लोकांमध्ये ग्रेगेरिअन कॅलेंडरप्रमाणे नववषार्चे स्वागत सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यात करतात. थायलंड आणि अन्य बौद्धबहुल देशांमध्ये १३ ते १५ एप्रिल असे तीन दिवस नववर्ष साजरे करतात. चिनी लोक नववर्ष ग्रेगेरियन कॅलेंडरनुसार पहिल्या चांद्र महिन्यातल्या पहिल्या दिवशी साजरे करतात. १ जानेवारी हा खरेतर खिस्ती धर्मियांचा नववषारंभ दिन आहे. खिस्तपूर्व इ.स. ४०० पूर्वी खिस्ती धर्मीय २१ मार्चला नववषारंभ साजरा करत असत. कालांतराने खिस्तीबहुल देशांनीच आपापल्या सोयीनुसार नववषारंभ दिन पालटले. रोमन सिनेटने पुढाकार घेऊन इसवीसन १५० मध्ये १ जानेवारीला वषारंभ होणारे सामायिक कॅलेंडर तयार केले. खिस्ती राष्ट्रेही अधिक आहेत. ही राष्ट्रे १ जानेवारीला नववषारंभ साजरा करतात. त्यामुळे १ जानेवारी हा जागतिक नववषारंभ आहे असा गैरसमज भारतीयांमध्ये निर्माण झाला आहे. १ जानेवारी हा खिस्ती नववषारंभ असल्याने भारतातील खिस्त्यांनी तो त्यांच्या रितीरिवाजानुसार अवश्य साजरा करावा; मात्र देशात हिंदूंनी गुढीपाडवा हाच खरा नववषारंभ आहे हे ध्यानात ठेवायला हवे.

■ **नरेश घरत, चेंबूर.**

# महापालिका निवडणुका नवीन पद्धत

**पूर्वार्ध**

**लेखन : सुधीर थोरवे**
**संपादन: देवेंद्र भुजबळ**
**9869484800**

निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील एकोणतीस महापालिकांमधील निवडणुका नुकत्याच जाहीर केलेल्या आहेत. तीन वर्षाच्या विलंबाने नवीन निवडणुका जाहीर झाल्यामुळे सगळीकडे मोठ्या प्रमाणात निवडणुकांचे पडघम वाजू लागलेले आहेत.

आतापर्यंत महापालिका निवडणुकीत एका प्रभागातून एकच नगरसेवक निवडून येत असे परंतु महापालिकेच्या आगामी निवडणुकीत (मुंबई महापालिका वगळता) यंदा एक महत्त्वाचा बदल लागू करण्यात आला आहे. तो म्हणजे एका वाडार्तून चार नगरसेवक निवडून देण्याची पद्धत. या नव्या व्यवस्थेमुळे नागरिकांमध्ये कुतूहलासोबतच काही प्रमाणात संभ्रमही निर्माण होऊ शकतो. तो दूर करण्यासाठी मतदान करण्यापूर्वी नवीन पद्धतीत काय बदल आहेत हे समजून घेणे आवश्यक ठरते.

नव्या बहुउमेदवारीय प्रभाग रचनेनुसार आता एका वाडार्तून चार नगरसेवक निवडले जाणार आहेत. यामध्ये प्रत्येक मतदाराला चार मते देण्याचा अधिकार असेल आणि सर्वाधिक मते मिळवणारे चार उमेदवार विजयी ठरतील.

नवीन पद्धतीने मतदार जास्तीत जास्त चार किंवा त्यापेक्षा कमी उमेदवारांना मत देऊ शकतो. नागरिकांनी मतदान करण्यापूर्वी आपल्या विभागात कोणकोणते उमेदवार उभे आहेत तसेच उमेदवाराची पात्रता, कामाची तयारी, प्रामाणिकपणा आणि नागरिकांशी संवाद साधण्याची क्षमता यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरेल. नागरिकांनी मतदानापूर्वी चारही उमेदवारांची माहिती घ्यावी, प्रचारात दिलेली आश्वासने लक्षात ठेवावीत. लोकशाहीत मतदान हा केवळ हक्क नसून ती एक मोठी जबाबदारी आहे.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■




थायरॉईडच्या रुग्णांसाठी हिवाळा ऋतू थोडा कठीण आणि संवेदनशील असू शकतो. सर्दी वाढल्याने सुस्ती, थकवा, वजन वाढणे आणि शरीरात सर्दी होणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. थायरॉईड रोगात औषधांबरोबरच योग्य आहारही खूप महत्त्वाचा आहे.

हिवाळ्यात लोक अनेकदा गरम, तळलेले आणि गोड पदार्थ खाण्यास सुरवात करतात, ज्यामुळे थायरॉईडच्या रुग्णांच्या समस्या वाढू शकतात आणि आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. अनेक वेळा चुकीच्या आहारामुळे औषधांचा परिणामही कमी दिसून येतो. अशा परिस्थितीत, हिवाळ्यात काय खावे आणि काय खाऊ नये याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे जेणेकरून लक्षणे नियंत्रित राहतील आणि चांगले आरोग्य राहील.

थायरॉईडची समस्या ही प्रामुख्याने शरीरातील संप्रेरकांच्या असंतुलनामुळे निर्माण होते. याची अनेक महत्त्वाची कारणे आहेत, त्यापैकी आनुवंशिकता हे एक प्रमुख कारण आहे; जर कुटुंबात कोणाला हा त्रास असेल, तर तो होण्याची शक्यता वाढते. तसेच, आपल्या आहारात आयोडीनच्या प्रमाणातील चढ-उतार (खूप जास्त किंवा खूप कमी) थायरॉईड ग्रंथीच्या कार्यावर थेट परिणाम करतात. स्त्रियांमध्ये प्रामुख्याने गर्भधारणा, प्रसूती किंवा रजोनिवृत्तीच्या काळात होणाऱ्या हार्मोनल बदलांमुळे थायरॉईडची समस्या उद्भवण्याचे प्रमाण अधिक असते.

याशिवाय, आजकालचा अति ताणतणाव आणि अपुरी झोप देखील या ग्रंथीच्या कामकाजात अडथळे निर्माण करतात. ऑटोइम्यून डिसीज जसे की हाशिमोटो किंवा ग्रेव्हज आजार थायरॉईडसाठी कारणीभूत ठरतात. यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती चुकून स्वतःच्याच थायरॉईड ग्रंथीवर हल्ला करते.

थायरॉईडच्या रुग्णांनी हिवाळ्यात जास्त तळलेले, मसालेदार आणि जंक फूड खाणे टाळावे, यामुळे वजन वाढते आणि थकवा येतो. सोया आणि सोया उत्पादनांचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने थायरॉईड संप्रेरकांचे संतुलन बिघडू शकते. कच्च्या अवस्थेत कोबी, फुलकोबी आणि ब्रोकोली सारख्या भाज्या जास्त प्रमाणात खाल्ल्याने देखील ही समस्या वाढू शकते. याशिवाय खूप गोड, पीठ आणि बेकरी उत्पादने देखील हानिकारक असू शकतात. थंडीमध्ये चहा आणि कॉफीचे जास्त सेवनदेखील थायरॉईडच्या रुग्णांसाठी योग्य नाही . म्हणूनच, या गोष्टी मर्यादित ठेवल्यास लक्षणे नियंत्रित करणे सोपे होते.

हिवाळ्यात थायरॉईडच्या रुग्णांनी संतुलित आणि पौष्टिक आहार घ्यावा. कोमट दूध, दही आणि चीज मर्यादित प्रमाणात शरीराला शक्ती देतात. हिरव्या भाज्या, हंगामी फळे आणि संपूर्ण धान्य आवश्यक पोषक तत्त्वे प्रदान करतात. बदाम, अक्रोड आणि फ्लॅक्ससीड्स सारख्या शेंगदाणे आणि बिया शरीराला ऊर्जा देतात आणि थंडीपासून संरक्षण करतात. पुरेसे प्रथिने मिळाल्याने थकवा कमी होतो आणि शरीर सक्रिय राहते. ह्या गोष्टी थायरॉईडच्या रुग्णांचे आरोग्य चांगले ठेवण्यास मदत करतात . ■ ■ ■

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### स्वागत करा पण..!

मदिरा पिऊनी कराल
नव वर्षाचे स्वागत -
तर ते ही तथास्तू म्हणून
वर्षभर ठेवेल तुम्हा झिंगत ..

नो दारू , नो बियर
म्हणाल हॅपी न्यु ईयर
तर तुमच्या कुटूंबात
येईल आनंदाची लहर ..

भारतीय संस्कृतीची
आपण कास धरू
मदिरा नव्हे दूध पिऊनी
नववर्षाचे स्वागत करू ..!



# टेस्टी कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स

झटपट रेसिपी

दो स्तांनो, एखाद्या संध्याकाळी चटपटीत पण वेगळा पदार्थ खावासा वाटला तर कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स ही डिश बनवून बघा.

**कृती :** बटाटे सोलून लांब काप करून घ्या. लाल सिमला मिरचीचीही लांब कापून घ्या. आल्याचे छोटे तुकडे करा. एका कढईत ऑलिव्ह ऑईल गरम करून त्यात जीरं घाला. मग हिंग आणि हळद घाला. आल्याचे तुकडे घालून परता. धने आणि बडिशेप कुटून घ्या. आता यात बटाटा आणि सिमला मिरचीचे काप घाला. थोडे शिजू द्या. मग सगळे मसाले आणि मीठ घाला. परतून घ्या. शिजल्यावर वरून कोथिंबिर घाला. मस्तपैकी कॅप्सिकम पोटॅटो स्ट्राईप्स खा.




# चिकाटीतून निर्माण केला जागतिक ब्रँड

अविष्कार

को लकात्याच्या रस्त्यांवर राहणारा एक शांत, अभ्यासू मुलगा डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहत होता, तर त्याचे वडील त्याला इंजिनियर बनवू इच्छित होते, पण कला त्याच्यात जन्मजात होती. लहानपणी तो खेळकरपणे त्याच्या वडिलांचे मोजे कापून त्याच्या बहिणीच्या बाहुल्यांसाठी कपडे बनवत असे. तो मोठा होत गेला तसतसे त्याचे स्वप्न बदलत गेले. तो रोहित खोसलाचे फॅशन शो पाहण्यासाठी सॅटर्डे क्लबच्या भिंतीवर चढत असे. भिंतीवर लटकत तो मेहर जेसिया आणि अर्जुन रामपालला खोसलाच्या डिझाइनमध्ये रॅम्पवर चालताना पाहत असे. त्याचे हृदय धावत असे, जणू काही तो दुसऱ्याच जगात प्रवेश करत होता. त्याच क्षणी त्याला जाणवले की त्याचे एकमेव आयुष्य म्हणजे डिझाइनर बनणे.

सब्यसाची ब्रँडचे संस्थापक आणि भारतातील सर्वात प्रसिद्ध फॅशन डिझायनरपैकी एक असलेल्या सब्यसाची मुखर्जी यांची ही कथा आहे. त्याच्या संघर्ष आणि चिकाटीने त्याने कोट्यवधींचे साम्राज्य निर्माण केले आणि त्याच्या ब्रँडला जागतिक मान्यता मिळवून दिली. आज सब्यसाची त्याच्या अद्वितीय कलात्मक शैली, भारतीय हस्तकलांचे पुनरुज्जीवन आणि भव्य डिझाइन तत्वज्ञानासाठी जगभरात ओळखला जातो. या पदापर्यंत पोहोचण्यासाठी त्याला ज्या अडचणींचा सामना करावा लागला त्यातून त्याने जो मार्ग काढला. तो प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी आहे.



सब्यसाचीचा जन्म २३ फेब्रुवारी १९७४ रोजी कोलकात्यातील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे वडील बांगलादेशातून निर्वासित होते आणि ज्यूट उद्योगात काम करत होते. त्याची आई कला शिक्षका होती. कुटुंब सामान्य होते, परंतु लहानपणापासूनच सब्यसाचीला कला, रंग आणि कापडाची खूप आवड होती. तो खोडकरपणे त्याच्या वडिलांचे मोजे कापून त्याच्या बहिणीच्या बाहुल्यांसाठी छोटे कपडे बनवत असे. हा त्याचा छंद बनला; पण काळाने एक वळण घेतले. प्लास्टिक उद्योगाच्या विस्ताराचा ज्यूट उद्योगावर परिणाम झाला आणि त्याच्या वडिलांची नोकरी गेली. कुटुंब आर्थिक संकटात सापडले. अवघ्या १५ वर्षां सब्यसाचीला त्याच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करावा लागला. त्याच्या वडिलांना तो अभियंता व्हावे, असे वाटत होते; परंतु कलाकार आणि डिझायनर होण्याचे स्वप्न त्याच्या हृदयात खोलवर रुजले होते.

लहानपणी सब्यसाचीने फॅशन डिझायनर बनण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा त्याच्या वडिलांनी या निर्णयाला विरोध केला आणि त्याच्या शिक्षणासाठी पैसे देण्यास नकार दिला. कुटुंबाचा विरोध आणि आर्थिक अडचण असूनही त्याने १६ व्या वर्षी तो घर सोडून गोवा गाठले. तिथे तो हॉटेल वेटर म्हणून काम करत होता. त्याने या उत्पन्नाचा वापर 'एनआयएफटी'चा अर्ज भरण्यासाठी केला. त्याचे पैसे संपले तेव्हा त्याने आपली पुस्तकेही विकली. काम आणि अभ्यासाचा समतोल साधत त्याने कठोर परिश्रम केले आणि शेवटी 'एनआयएफटी' परीक्षा उत्तीर्ण झाली. हा त्याच्या आयुष्यातील पहिला मोठा विजय होता.

'एनआयएफटी' नंतर त्याने अहमदाबादमधील 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन'मध्ये प्रवेश घेतला, परंतु आर्थिक अडचणी, कुटुंबापासूनचे अंतर, स्वतःला सिद्ध करण्याचा दबाव आणि वाढत्या जोखीम यामुळे त्याची मानसिक स्थिती खालावली. हळूहळू तो एका खोल नैराश्यात गेला. त्याची प्रकृती इतकी बिकट झाली, की त्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्नही केला. त्या वेळी, त्याच्या आईने नैराश्य सर्दीइतकेच सामान्य आहे, असे सांगितले. त्यानंतर त्याने त्याच्या मानसिक संघर्षाची कबुली दिली आणि हळूहळू स्वतःला बळकट करू लागला. अनेक वर्षे नैराश्यात असतानाही आयुष्याने त्याच्यासाठी सर्जनशील शक्यतांची नवी दारे उघडली. १९९९ मध्ये 'एनआयएफटी' मधून पदवी घेतल्यानंतर, सब्यसाचीने नोकरी न करण्याचा आणि स्वतःची कंपनी सुरु करण्याचा निर्णय घेतला.


## शेर की जुबानी

* तसल्ली से पढे होते... तो समझ में आते हम, जरूर कुछ पन्ने, बिना पढे ही पलट दिए होंगे।

गुस्से में कुछ और भी हसीन लगते हो, बस यही सोच कर तुमको खफा रखा है।

ख्वाहिशों का आदी दिल काश ये समझ सकता, कि सांस टूट जाती है, एक आस टूट जाने से।

## अॅप वर्ल्ड



### 'व्हॉट्सअॅप'ची नवीन फीचर्स

व्हॉट्सअॅपची अनेक नवीन फीचर्स आली आहेत. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार या फीचर्समध्ये मिस्ड कॉल मेसेजेस, नवीन इंटरॅक्टिव्ह स्टेटस स्टिकर्स, डेस्कटॉपसाठी नवीन मीडिया टॅब आणि मेटा 'एआय' मध्ये अपग्रेडेड इमेज जनरेशन टूल्स यांचा समावेश आहे.

मेटा 'एआय' आता तुमचे कोणतेही फोटो एका लहान व्हिडीओमध्ये ॲनिमेट करू शकते. तुम्ही ते शेअर करू शकता. कोणी तुमचा व्हॉट्सअॅप कॉल उचलला नाही, तर तुम्ही त्यांच्यासाठी व्हॉइस किंवा व्हिडीओ नोट सोडू शकता. वेगळा संदेश पाठवण्याऐवजी तुम्ही त्वरित व्हॉइस किंवा व्हिडीओ संदेश रेकॉर्ड करून त्या व्यक्तीला पाठवू शकता. याव्यतिरिक्त, संभाषणात व्यत्यय न आणता प्रतिक्रिया देण्यासाठी 'व्हॉइस चॅट' अपडेट केले आहेत आणि ग्रुप व्हिडिओ कॉलमध्ये बोलणाऱ्याला हायलाइट केले जाईल. डेस्कटॉपवर एक नवीन मीडिया टॅब जोडण्यात आला आहे. तो एकाच ठिकाणी कागदपत्रे, मीडिया आणि लिंक्स प्रदर्शित करतो. लिंक प्रिव्ह्यू देखील सुधारण्यात आले आहेत. स्थिती आणि चॅनेल व्हॉट्सअॅपने स्टेटसमध्ये संगीताचे बोल, प्रश्न प्रॉम्प्ट आणि इतर घटक यासारखे नवीन परस्परसंवादी स्टिकर्स जोडण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे युजर्सना इतर युजर्सशी संवाद साधता येतो. चॅनेल प्रशासक आता सदस्यांकडून कोणत्याही प्रश्नाचे रिअल-टाइम प्रतिसाद प्राप्त करण्यास सक्षम असतील. ही वैशिष्ट्ये अनेक वापरकर्त्यांसाठी उपलब्ध झाली आहेत.

## गॅजेट्स



### आयफोनची आयओएस २६.२ व्हर्जन

ॲपलने आयओएस २६.२ रिलीज केले आहे. कंपनीने बीटा टेस्टर्ससाठी त्याची 'रिलीज कॅन्डिडेट' (आरसी) आवृत्ती आधीच आणली आहे. या अपडेटमध्ये आयफोन युजर्सना अनेक नवीन फीचर्स मिळण्याची अपेक्षा आहे. आयओएस २६.२ अपडेटमध्ये अनेक डिझाइन बदल आणि नवीन फीचर्स आहेत. सर्वात महत्त्वाची भर म्हणजे लॉक स्क्रीनवरील लिक्विड ग्लास स्लायडर. यामुळे युजर्सना घड्याळाची पारदर्शकता समायोजित करता येईल. याव्यतिरिक्त युरोपीयन देशांमधील युजर्ससाठी आयआर पॉड्समध्ये लाइव्ह ट्रान्सलेशनदेखील जोडले जात आहे.

**ॲपल सेवांमध्ये अपग्रेड** –आगामी अपडेटमध्ये म्युझिक आणि पॉडकास्ट सारख्या ॲपल सेवांमध्येही अपग्रेड मिळतील. आयओएस २६.२ अपडेटसह, ॲपल म्युझिकमध्ये ऑफलाइन लिरिक्स असतील. त्यामुळे युजर्स इंटरनेट ॲक्सेस नसतानाही गाणी ऐकू शकतील. ॲपल पॉडकास्टमध्ये 'एआय–जनरेटेड चॅप्टर' आणि 'ॲपल न्यूज'मध्ये एक नवीन लेआउटदेखील असेल. नवीन अपडेटमुळे सुरक्षा अलर्ट आणि एअरड्रॉप सुरक्षादेखील सुधारते.

**कसे अपडेट करायचे?**– सेटिंग जनरल वर जा आणि सॉफ्टवेअर अपडेटवर टॅप करा. तुम्हाला अपडेट दिसले, तर ते इन्स्टॉल करा.

# पदवी नाही? चिंता नको!




कारकिर्द

भा रतातील आघाडीची टेक कंपनी 'झोहो' पदवीशिवाय तरुणांना नोकऱ्या देत आहे. कंपनीचे मुख्य शास्त्रज्ञ आणि सह–संस्थापक श्रीधर वेम्बू यांनी ही घोषणा केली. श्रीधर वेम्बू यांनी भारतीय पालकांना काही खास सल्लाही दिला. त्यांनी 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म 'एक्स' वर अमेरिकेतील फर्म पलांटिरच्या भरती पद्धतीबद्दल झालेल्या संभाषणावर भाष्य केले. एका पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे, की हुशार अमेरिकन विद्यार्थी आता महाविद्यालयात जात नाहीत. त्यांना दूरदृष्टी असलेल्या कंपन्यांकडून मदत केली जात आहे. हा एक सांस्कृतिक बदल आहे. हे खरोखरच युवा शक्तीचे प्रतीक आहे. त्यामुळे तरुण पुरुष आणि महिला पदवीसाठी मोठे कर्ज न घेता स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात. हा ट्रेंड जगाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलेल आणि संस्कृती आणि राजकारणातही परिवर्तन घडवून आणेल.

भारतातही आता पदवीशिवाय नोकरी मिळणार आहे. वेम्बू यांनी त्यांच्या पोस्टमध्ये सुशिक्षित भारतीय पालकांना आणि हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना तसेच आघाडीच्या कंपन्यांना आवाहन केले आहे. 'झोहो'मधील कोणत्याही नोकरीसाठी महाविद्यालयीन पदवीची आवश्यकता नाही. श्रीधर वेम्बू यांनी भारतीय पालकांना सल्ला दिला, त्यांनी केवळ गुण आणि पदवीसाठी मुलांवर दबाव आणू नये. भारतात, शिक्षणाच्या नावाखाली मुलांना अनेकदा माहिती लक्षात ठेवण्यास भाग पाडले जाते, परंतु वास्तविक जीवनात कोणत्याही करिअरमधील यश कौशल्यांवर अवलंबून असते. ते म्हणाले, प्रत्येक मूल विद्यापीठात टॉपर बनू शकत नाही, परंतु प्रत्येक मुलामध्ये निश्चित काही ना काही खरी प्रतिभा असते.

श्रीधर वेम्बू यांनी असेही स्पष्ट केले, की 'झोहो'ने भारतातील अनेक लहान गावे आणि शहरांमधील मुलांना जागतिक दर्जाचे व्यावसायिक बनण्यासाठी प्रशिक्षण दिले आहे. शिकण्याची भूक असलेला कोणीही खूप उंची गाठू शकतो, हे 'झोहो स्कूल्स ऑफ लर्निंग' नावाचे त्यांचे मॉडेल हे सिद्ध करते.

# थंडीत ट्रेंडी दिसण्यासाठी...

फॅशन पॅशन

थं डीच्या काळात केवळ उबदार कपडे वापरणे हे कालबाह्य झाले आहे. आजकालचे पुरुष थंडीतही ट्रेंडी दिसू इच्छितात. प्रत्येक पोशाखाला एक क्लासी टच देणे आवश्यक झाले आहे. या हिवाळ्यात कोणते ट्रेंडी कपडे तुम्हाला आकर्षक लूक देतील, ते समजून घेऊ.

**टर्टलनेक स्वेटर**

टर्टलनेक स्वेटर कधीही आऊट ऑफ फॅशन जात नाहीत. ते तुम्हाला उबदार तर ठेवतातच, पण तुम्हाला एक रॉयल लूकदेखील देतात. काळ्या, नेव्ही ब्लू किंवा राखाडी रंगाचे टर्टलनेक स्वेटर प्रत्येक प्रसंगासाठी परिपूर्ण आहेत. तुम्ही ते ब्लेझर किंवा जॅकेटखाली घालू शकता. ऑफिस लूक असो किंवा कॅज्युअल मीटिंग, ते परिपूर्ण आहेत. त्यांना जीन्स आणि लेदर बूटसह परिधान केल्यास तुमचा लूक आणखी डॅशिंग होईल.



**स्वेटशर्ट**

स्वेटशर्ट फॅशन सेन्स साधा; पण स्मार्ट हवा असलेल्यांसाठी योग्य आहेत. सौम्य हिवाळ्यात ते सर्वात आरामदायक आणि स्टायलिश पर्याय आहेत. प्रिंटेड असो वा ओव्हरसाईज, प्रत्येक स्टाईलच्या स्वेटशर्टचे स्वतःचे आकर्षण असते. कॉलेजला जाणाऱ्या मुलांमध्ये हा ट्रेंड नेहमीच टॉप नॉच असतो, कारण तो कॅरी करायला खूप सोपा असतो.

**कॅज्युअल हुडी**

हिवाळ्यातील कॅज्युअल फॅशनचा विचार केला तर, हुडीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. हुडी प्रत्येक वयोगटात आणि प्रत्येक प्रसंगाला अनुकूल असतो. तो तुम्हाला केवळ उबदार ठेवत नाही, तर तुम्हाला एक कूल आणि आरामदायी लूकदेखील देतो. झिप–अप हुडज खूपच फॅशनेबल आहेत.

# नौदल की मर्चंट नेव्ही?

करियर

अ थांग समुद्राच्या पाण्यावरती दोन जग तरंगत आहेत. त्यातील एक राष्ट्राचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक लाटेशी लढत असते आणि दुसरे जगभरात माल वाहतूक करून अब्जावधी कमावतात. अनेकांना या दोन्ही नेव्ही एकच असल्यासारखे वाटते, मात्र त्यांचे मार्ग पूर्णपणे वेगळे आहेत.

भारतीय नौदल एक शिस्त, जोखीम आणि राष्ट्रसेवेच्या इच्छेने प्रेरित आहे, तर मर्चंट नेव्ही पैसे, आराम आणि आंतरराष्ट्रीय जीवनशैलीच्या ग्लॅमरने प्रेरित आहे. दोन्हीपैकी या क्षेत्रात काम करण्याचे अनेक तरुण आणि तरुणींचे स्वप्न असते, मात्र यापैकी कोणत्या नेव्हीमध्ये नोकरी करावी, असा प्रश्न अनेकदा पडत असतो.

भारतीय नौदल देशाच्या सागरी सीमांची सुरक्षा धोक्यात असते अशा ठिकाणी काम करते. सीमेवर शत्रू आणि बाहेरील लोकांवर नजर ठेवते आणि कोणत्याही हल्ल्याला उत्तर देते. या दलाची जहाजे सरकारच्या मालकीची असतात आणि प्रत्येक मोहिमेत राष्ट्रीय हितसंबंध सर्वात पहिले जोपासले जातात.

मर्चंट नेव्ही हे व्यावसायिक क्षेत्र आहे. समुद्राला एक प्रमुख व्यवसाय कॉरिडॉर म्हणून पाहते. इथे व्यापारी माल एका देशातून दुसऱ्या देशात जहाजांद्वारे नेला जातो. या कामात सरकारी आणि खासगी अशा दोन्ही कंपन्या कार्यरत आहेत. या मध्यमातून जहाजे मालवाहतूक, तेल वाहतूक करतात आणि जागतिक व्यापाराचे एक विशाल नेटवर्क व्यवस्थापित करतात.

**प्रशिक्षणापासून पदवीपर्यंत**

भारतीय नौदलात सामील होणे ही केवळ नोकरी नाही, तर ती वैभवाचा मार्ग आहे. यासाठी 'एनडीए' आणि 'आयएनए' सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रशिक्षण दिले जाते. तिथे उमेदवारांना बी. टेक पदवी आणि कठोर




लष्करी शिस्त दोन्ही मिळते. दुसरीकडे मर्चंट नेव्हीमध्ये सामील होण्यासाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये १०+२ आवश्यक आहे. १८ महिन्यांच्या कठोर समुद्र प्रशिक्षणानंतर, कॅडेट्स जहाजांवर सहाय्यक अधिकारी बनतात. एकीकडे, विज्ञान आणि अभियांत्रिकीची मजबूत समज असते आणि दुसरीकडे, सागरी तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय नियमांची पकड असते.

**कामाची वेगळी गती**

भारतीय नौदलाची कर्तव्ये अत्यंत गतिमान असतात. कधीकधी ऑपरेशन्स आठ तास, कधीकधी बारा तास आणि कधीकधी अगदी दिवसभर चालतात. पदोन्नती वेळ, अनुभव आणि स्पर्धा परीक्षांवर अवलंबून असते, तर मर्चंट नेव्हीमध्ये, ड्युटी नियमित असते. आठ ते नऊ तासांच्या शिफ्टसह, उर्वरित वेळ विश्रांतीमध्ये घालवला जातो. पदोन्नती समुद्रात घालवलेला वेळ आणि परीक्षा उत्तीर्ण होण्याची क्षमता या दोन निकषांवर अवलंबून असते. एखादी व्यक्ती जितका जास्त काळ समुद्रात असेल तितकी त्याची प्रगती जलद होते.

**फायदे, वैशिष्ट्ये आणि भविष्य**

भारतीय नौदलाचे फायदे केवळ नोकरीच्या पलीकडे जातात. कुटुंबासाठी सरकारी निवासस्थाने, अनुदानित कॅन्टीन, मोफत वैद्यकीय सेवा आणि निवृत्तीनंतरचे पेन्शन हे आदी गोष्टींचा लाभ घेता येतो, तर मर्चंट नेव्हीचे फायदे 'आयएलओ' आणि 'आयटीएफ'सह आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित आहेत.

## स्वयंरोजगार



### विक्री हस्तकलेच्या वस्तुंची

सध्या हस्तकलेच्या वस्तूंना बरीच मागणी आहे. गृह सजावटीच्या या वस्तू अनेकांना आकर्षित करतात. तुमच्या अंगी अशा वस्तू बनवण्याची कला असेल किंवा हस्तकलेच्या वस्तूंच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्हाला चांगली संधी मिळू शकते. या वस्तू वेबसाईट्सच्या माध्यमातून विकल्या जातात. यासाठी स्वतःची वेबसाईट तयार करता येईल किंवा ई कॉमर्स वेबसाईट्सवरून या वस्तूंची विक्री करता येईल. हस्तकलेच्या अनोख्या किंवा अँटिक वस्तू विकण्याचा व्यवसाय करायच्या विचारात असाल तर या टिप्स उपयोगी पडतील.

* आपल्याकडच्या वस्तू वेगळ्या किंवा अँटिक असतील याची खात्री करून मगच त्या विक्रीसाठी उपलब्ध करा. लोकांना काहीतरी वेगळं, हटके हवं असतं. त्यामुळे अशाच वस्तू विका. तसंच झोकून देऊन काम करा.
* आपल्याकडच्या उत्पादनांचे प्रभावी फोटो पोस्ट करा. तसंच या उत्पादनांची माहिती अनोख्या पद्धतीने मांडा.
* सुरुवातीला ठराविक उत्पादनांचीच विक्री करा. वस्तूंची संख्या हळूहळू वाढवा. हस्तकलेच्या वस्तूंचा दर्जा टिकवून ठेवणं गरजेचं आहे. उत्तम आणि दर्जेदार वस्तूंची विक्री केली तरच तुम्ही ग्राहकांना जोडून घेऊ शकता.

# प्रेम का उच्चशिक्षण?



मॅच मेकिंग

मा झं एका मुलीवर प्रेम होतं. आमचं तीन वर्षांचं नातं संपलं. पण तिच्याशिवाय मला करमत नव्हतं. मन रमत नव्हतं. तिची खूप आठवण यायची. म्हणून हे नातं पुन्हा जोडण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तिला संपर्क करत राहिलो. पण तिने. प्रतिसाद दिला नाही. तिच्या बहिणीची मदत घ्यायचं ठरवलं. पण या आघाडीवरही निराशाच हाती आली. मैत्रिणीच्या बहिणीने माझा अपमान केला आणि तिच्या आयुष्यातून निघून जायला सांगितलं. या मुलीकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. माझे वडील आजारी असतानाही तिने संपर्क केला नाही. पण तिच्यावर खूप प्रेम असल्यामुळे हा दुरावा सहन होत नाही. जर्मनीत एमबीएची संधी चालून आली आहे. पण मधल्या काळात या मुलीचं लग्न होऊ शकतं. मग तिला कायमचं गमावून बसेन. काय करू?

**उत्तर :** मित्रा, तीन वर्षे जपलेलं नातं संपवून नव्याने आयुष्य सुरु करणं खूप कठीण आहे. पण आयुष्यात काही कठोर निर्णय घ्यावेच लागतात. स्वतःच्या भविष्याचा विचार करावा लागतो. जर्मनीत एमबीए करण्याची संधी सगळ्यांना मिळत नाही. त्यामुळे ही संधी सोडू नकोस. शिक्षणामुळे तुझं भविष्य घडणार आहे. त्यातच या मुलीकडून तुला कोणताही प्रतिसाद मिळत नसताना तिच्यासाठी आयुष्यभराची संधी सोडण्यात अर्थ नाही. एखाद्या व्यक्तीसोबत आयुष्य घालवणं यालाच प्रेम म्हणत नाहीत. प्रेम ही भावना खूप उदात्त आहे. प्रिय व्यक्तीच्या आनंदात आनंद मानणं हे सुद्धा प्रेमच आहे. त्यामुळे जर्मनीला जाण्याचा निर्णय घे. हेच तुझ्यासाठी योग्य आहे. योग्य वेळी योग्य व्यक्ती तुझ्या आयुष्यात येईल.

# निसर्गरम्य शांत ठिकाणे

भटकंती

न वीन वर्षाची संध्याकाळ ही फक्त पार्टी करण्याबद्दल नाही, तर ती एका नवीन सुरुवातीसाठी स्वतःला तयार करण्याबद्दलदेखील आहे. गर्दीत जाण्याऐवजी तुम्ही भारतातील या पाच सुंदर आणि शांत ठिकाणांना भेट देऊ शकता, जिथे तुम्ही खरोखर आनंदात नवीन वर्ष साजरे करू शकता.

**लँडोर, उत्तराखंड**

तुम्हाला डोंगराळ भागांमध्ये फिरायला आवडत असेल तर मसुरीपासून काही अंतरावर असलेले लँडोर तुमच्यासाठी स्वर्ग असेल. मसुरीपासून अगदी वरच्या बाजूला वसलेले हे छोटे शहर त्याच्या शांतता आणि जुन्या ब्रिटिश वास्तुकलेसाठी ओळखले जाते. दाट पाइन जंगले हवेत एक अनोखी जादू भरून ठेवतात. प्रसिद्ध विंटर लाईनचे दृश्य आणि शांत कॅफेमध्ये गरम कॉफीचा कप तुमच्या वर्षाची सुरुवात संस्मरणीय बनवेल.

**तीर्थन व्हॅली, हिमाचल प्रदेश**

निसर्गात वेळ घालवायचा असेल, तर कुल्लू किंवा मनालीऐवजी तीर्थन व्हॅलीला जाण्याचा विचार करा. वाहत्या नदीचा गुरगुरणारा आवाज आणि सुंदर लाकडी घरे तुम्हाला मंत्रमुग्ध करतील. हे ठिकाण ग्रेट हिमालयीन राष्ट्रीय उद्यानाजवळ आहे. येथे तुम्ही मासेमारी करू शकता, ट्रेकिंग करू शकता किंवा नदीकाठी बसून पुस्तक वाचू शकता. येथील शांतता तुमचा थकवा त्वरित दूर करेल.



**गोकर्ण, कर्नाटक**

समुद्रकिनारे आवडत असतील पण गोव्याची गर्दी नको असेल तर गोकर्ण हे तुमच्यासाठी एक परिपूर्ण ठिकाण आहे. ओम बीच आणि पॅराडाईज बीचवर सूर्यास्त पाहणे हा खरोखरच आध्यात्मिक अनुभव आहे. गोकर्ण मध्ये तुम्हाला पार्टीचे वातावरण आणि आध्यात्मिक शांतता दोन्ही देते. येथे तुम्ही समुद्राच्या लाटांचा आवाज ऐकत वाळूवर अनवाणी चालत नवीन वर्षाचे स्वागत करू शकता.

**ओरछा, मध्य प्रदेश**

तुम्ही इतिहास आणि राजघराण्यातील लोकांचे चाहते असाल तर मध्य प्रदेशातील ओरछा तुम्हाला निराश करणार नाही. बेतवा नदीच्या काठावर वसलेले हे शहर तुम्हाला भूतकाळात घेऊन जाईल. येथील किल्ले, राजवाड्यांना भेट देण्यासारखे आहे. संध्याकाळी नदीकाठावर बसून सूर्यास्त पाहणे आणि आश्चर्यकारक वास्तुकलेचे कौतुक करणे तुमच्या उत्सवाला एक शाही स्पर्श देईल. हे शहर विरळ गर्दीचे आहे, म्हणून तुम्ही शांततेत एक्सप्लोर करू शकता.

**झिरो व्हॅली, अरुणाचल प्रदेश**

तुम्हाला खरोखरच एक अनोखा आणि असाधारण अनुभव हवा असेल तर ईशान्येकडे जा. अरुणाचल प्रदेशची झिरो व्हॅली हिरवळीसाठी आणि आदिवासी संस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. येथील भातशेती आणि पाइनची जंगले चित्रांसारखी दिसतात. हे ठिकाण इतके शांत आहे, की तुम्हाला स्वतःच्या हृदयाचे ठोके ऐकू येतात. नवीन वर्षाच्या दिवशी निसर्गाच्या इतक्या जवळ असणे हे एक वरदान आहे.

# थंडीतही सुरू ठेवा व्यायाम



फिटनेस

हु डहुडी भरवणाऱ्या थंडीत सकाळी उठून व्यायाम करणं जीवावर येतं. अंगावरचं पांघरुन बाजूला करावंसं वाटत नाही. पण तासभर झोपण्यासाठी आपण आपल्या आरोग्याकडे, फिटनेसकडे दुर्लक्ष करतो. एखाद्या दिवशी झोपणं ठीक आहे. पण दररोजचा आळस उपयोगाचा नाही. थंडीच्या दिवसातही स्वतःला व्यायामासाठी कसं सज्ज करता येईल याबाबतच्या काही टिप्स...

* थंडीत घराबाहेर पडायचं नसेल तर घरीच व्यायाम करा. योगा, जॉगिंग, डान्स असं काहीही करता येईल. घरच्या घरी करण्यासारखे साधेसोपे व्यायामप्रकार आहेत. हे व्यायाम करून तुम्ही फिट राहू शकता.
* दररोज एकाच प्रकारचा व्यायाम करून कंटाळा येतो. मग व्यायाम टाळला जातो. व्यायाम एकसुरी होत असेल तर डान्स, जीम, योगा, धावणं असं वैविध्य आणण्याचा प्रयत्न करा. यामुळे तुम्हाला दररोज व्यायाम करावासा वाटेल.
* व्यायाम करण्यामागची कारणं टिपून ठेवा. काही जण वजन कमी करण्यासाठी किंवा फिटनेससाठी व्यायाम करतात. आपल्याला व्यायामाची गरज का आहे, त्यामागचा आपला उद्देश काय हे लिहून ठेवलं की तुम्हाला व्यायामाची प्रेरणा मिळेल.

# एक्सपायरी औषधांचा मोठा साठा जप्त



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २९ :

अकोल्यातील मूर्तिजापूर शहरात नागरिकांच्या जीवाशी थेट खेळ करणाऱ्या घातक औषध साठवणुकीचा धक्कादायक पर्दाफाश झाला आहे. गोपनीय माहितीच्या आधारे मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार अजित जाधव यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथकाने घरकुल परिसरातील एका घरावर छापा टाकला.

या कारवाईत लाखो रुपयांचा एक्सपायरी मानवी औषधांचा साठा आढळून आला. ही औषधे बाजारात पोहोचली असती, तर गंभीर आजारग्रस्त रुग्णांच्या जीवावर बेतण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

कारवाईदरम्यान एक व्यक्ती ताब्यात घेण्यात आली असून मात्र हा साठा नेमका कोणाच्या मालकीचा आहे, कोणत्या मेडिकल किंवा वितरण साखळीत जाणार होता, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. औषधांच्या नावाखाली नफेखोरी करत जनतेच्या आरोग्यावर घाला घालणाऱ्यांचे हे जाळे किती खोल आहे, याचा तपास सुरू आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली असून दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# बरांज मोकसा येथे केपीसीएल कंपनीची मनमानी!

## पुनर्वसन रखडले, रोजगार हुकला : केपीसीएलचा 'कोळसा' मात्र जोरात!








■ नरेंद्र देशमुख, वर्धा, दि. २९ :

चंद्रपूर जिल्हा म्हणजे कोळशाची खाण, पण याच कोळशाने आता स्थानिकांचे जगणे कठीण केले आहे. भद्रावती तालुक्यातील 'बरांज मोकासा' या गावातून एक संतापजनक वास्तव समोर येत आहे. एकीकडे गावकऱ्यांच्या पुनर्वसनाचा पत्ता नाही, हाताला काम नाही, मात्र दुसरीकडे केपीसीएल कंपनीने वन जमिनीतून अवैध कोळसा उपसा करण्याचा सपाटा लावला आहे. जिल्हा प्रशासन आणि वन विभाग झोपले आहे की त्यांना जाणीवपूर्वक दुर्लक्ष करायला लावले जात आहे. वाचा आमचा हा विशेष रिपोर्ट.

चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील बरांज मोकासा हे गाव सध्या अस्तित्वाच्या लढाईला सामोरे जात आहे. केपीसीएल कंपनीच्या कोळसा खाणीमुळे गावकरी त्रस्त झाले असून, कंपनीच्या मनमानी कारभाराने सर्व सीमा ओलांडल्या आहेत.

गावाचे पुनर्वसन करणे आणि स्थानिक सुशिक्षित तरुणांना रोजगार देणे हे कंपनीचे नैतिक आणि कायदेशीर कर्तव्य असताना, त्याकडे पूर्णपणे कानाडोळा केला जात असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.

**वन जमिनीवर डाका?**

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, कंपनीने आपली हद्द ओलांडून वन विभागाच्या जमिनीतून मोठ्या प्रमाणात अवैध कोळसा उत्खनन सुरू ठेवले आहे. लाखो मेट्रिक टन कोळसा नियमांची पायमल्ली करून काढला जात आहे. यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत असून गावच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होत आहे.

**प्रशासनाचे संशयास्पद मौन**

गावकऱ्यांनी या अन्यायाविरुद्ध वेळोवेळी आवाज उठवला आहे. वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि खनिकर्म विभाग यांच्याकडे पुराव्यांसह तक्रारी करण्यात आल्या. अनेक वेळा आंदोलने, धरणे आणि निवेदने देण्यात आली.

परंतु, इतके होऊनही प्रशासन कंपनीवर कोणतीही ठोस कारवाई करताना दिसत नाही. उलट, कंपनीचे उत्खनन अधिक जोमाने सुरू असल्याने शासनाचा कंपनीला वरदहस्त आहे का? असा सवाल आता विचारला जात आहे.

**गावकऱ्यांची व्यथा**

आम्ही आमच्या जमिनी दिल्या, पण आज आमचीच मुले बेरोजगार आहेत. गावात धूळ आणि प्रदूषणाशिवाय काहीच उरलेले नाही. आमचे पुनर्वसन रखडले आहे आणि आमची जमीन ओरबडली जात आहे, अशा भावना हताश झालेल्या गावकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत. खाणकाम बंद व्हावे किंवा न्याय मिळावा यासाठी गावकरी शेवटची लढाई लढण्याच्या तयारीत आहेत.

एकीकडे विकास आणि ऊर्जेच्या गप्पा मारल्या जात असताना, दुसऱ्या बाजूला एका संपूर्ण गावाला वाऱ्यावर सोडणारी ही विकासनीती नक्की कोणासाठी? आता तरी जिल्हा प्रशासन या 'अवैध' कारभाराला लगाम घालणार की केपीसीएलची मनमानी अशीच सुरू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधवांच्या वाहनाला अपघात

## तिघे गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २९ :

बुलढाण्याचे खासदार तथा केंद्रीय आरोग्य, आयुष व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या वाहनाला भीषण अपघात झाला. यात तिघेजण जखमी झाले असून त्यांच्यावर वाशीम येथील खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे.

समृद्धी द्रुतगती महामार्गवरील मालेगावनजिक ही दुर्घटना घडली. केंद्रीय मंत्र्यांचे वाहन आणि मालवाहू (ट्रक) ची भरवेगात धडक झाली. यात कारची मोठ्या प्रमाणात मोडतोड झाली.

सुदैवाने हा अपघात झाला तेव्हा मंत्री कारमध्ये नव्हते. या अपघातामध्ये तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना नागपूर विमानतळावर सोडल्यानंतर त्याचे अंगरक्षक, सहकारी आणि कारचालक हे मेहकरच्या दिशेने जात होते.

याचदरम्यान समृद्धी महामार्गावर हा अपघात झाला. धडक इतकी भीषण होती की यामध्ये कारचा चक्काचूर झाला. अपघातामध्ये प्रतापराव जाधव यांचे अंगरक्षक, त्यांचे सहकारी आणि कारचालक हे तिघे जण गंभीर जखमी झाले. तिघांना पोलिसांनी तात्काळ वाशिम येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरू आहे. मंत्री प्रतापराव जाधव यांना अपघाताची माहिती मिळताच त्यांनी



दिल्ली दौरा रद्द केला. ते मुंबईवरून परतले. त्यांनी जखमींची भेट घेत त्यांच्या प्रकृतीबाबत विचारपूस केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा अपघात समृद्धी महामार्गावर माले गावजवळ झाला. मंत्री प्रतापराव जाधव यांची कार नागपुरवरून मेहेकरच्या दिशेने जात होती. तर मुंबईवरून एक मिनी ट्रक नागपुरकडे जात होता.

या ट्रकने महामार्गावर अचानक युटर्न घेतला त्यामुळे चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि या कारने थेट ट्रकला जोरदार धडक दिली. अपघातामध्ये जीवितहानी झाली नाही मात्र कारमधील तिघे जण गंभीर जखमी झाले. अपघातात कारचा चुराडा झाला. पोलिस अपघाताचा तपास करत आहेत.

# सगळे बाहेरचेच येतील तर आमचे काय?

## इच्छुकांनी अडवली मंत्री बावनकुळेंची गाडी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख दोन दिवसांवर येऊन ठेपली तरी नागपूरमध्ये भाजप आणि काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांनी अद्याप त्यांची उमेदवारांची यादी जाहीर केली नाही. रविवारी काँग्रेसने महापालिकेसाठी मिशन १०० ची घोषणा केली तर भाजपने केंद्रीय मंत्री नितीन गडकरीं यांच्या निवासस्थानी बैठक घेऊन उमेदवारांबाबत चर्चा केली.

सोमवारी सकाळपासून इच्छुक उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी गडकरींच्या घरासमोर गर्दी केली आहे. यावेळी आपल्या प्रभागातून दुसऱ्याच पक्षातून आलेल्या नवीन लोकांना उमेदवारी दिली जात असल्याची चर्चा इच्छुकांमध्ये आहे. यामुळे भाजपचे इच्छुक उमेदवार प्रचंड संतापले असून त्यांनी चक्क महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा ताफा अडवला.

तसेच बाहेरच्याच लोकांना पक्ष उमेदवारी देत असेल तर अनेक वर्षांपासून पक्षात असलेल्या आमच्यासारख्या कार्यकर्त्यांचे काय? असा प्रश्न केला. बावनकुळे साहेब कृपया तुम्ही लक्ष द्या, अशी विनंतीही कार्यकर्त्यांनी केली.

मागील एक आठवड्यापासून भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षात उमेदवार निश्चित करण्याबाबत बैठकांचे सत्र सुरू आहे. काँग्रेसमध्ये पक्षश्रेष्ठी याबाबत अंतिम निर्णय घेते. मात्र भाजपचे सर्व निर्णय नागपुरातच होतात. नागपूर महापालिका भाजपसाठी प्रतिष्ठेची आहे, तर १५ वर्षांपासून सत्तेपासून दूर असलेल्या काँग्रेसने पुन्हा महापालिकेत सत्ताप्राप्तीसाठी कंबर कसली आहे. त्यामुळे दोनही पक्षाकडून बंडखोरी टाळण्यासाठी सावध पावले उचलली जात आहे.

रविवारी उमेदवारांवर चर्चा करण्यासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी कोअर कमिटीची बैठक झाली. दुसरीकडे देवडिया भवनात काँग्रेसची बैठक झाली. त्यात मिशन १०० ची घोषणा करण्यात आली. मात्र, दोनपानी उमेदवारी यादी जाहीर केली नाही. त्यामुळे दोन्ही पक्षातील इच्छुकांमध्ये संभ्रमाची अवस्था आहे.

**नाराजांना समजवणे पाच मिनीटांचे काम**

यासंदर्भात चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी नागपूरसह अन्य शहरांमधील युती आणि उमेदवारी यादीचे चित्र आज स्पष्ट होईल असे सांगितले. तसेच नाराजांची संख्या मोठी असली तरी भाजपचा कार्यकर्ता समजदार असून त्यांची अवघ्या पाच मिनीटात आम्ही समजूत काढू शकू असेही ते म्हणाले. सर्वच भागातील युतीबाबत निर्णय झाला असून कुठेही वाद नाही असेही ते म्हणाले.

# : व्हेरिकोज व्हेन्स : कारणं, लक्षण आणि उपचार

लोकारोग्य



मानवी शरीरातील बव्हंशी आजार हे रक्तवाहिन्यांशी संबंधित असतात. व्हेरीकोन्स व्हेन्स अर्थात पायाच्या बाह्य भागात अचानक फुगलेल्या रक्तवाहिन्या दिसू लागतात. सर्वसाधारणपणे जास्त उंचीच्या लोकांमध्ये या व्हेरीकोन्स व्हेन्स प्रकर्षाने दिसतात.

या रक्तवाहिन्या कालांतराने फुगू लागतात.आणि अशा व्यक्तीला मग उभे राहणे किंवा चालताना देखील पायामधे प्रचंड वेदना होतात. या व्हेरीकोन्स व्हेन्स कडे दुर्लक्ष केले तर हा आजार गंभीर स्वरूप धारण करू शकतो. मुळात,व्हेरीकोन्स व्हेन्स हा आजार नेमका काय आहे? या आजराची लक्षण काय असतात?आणि कारण काय असतात?आणि महत्वाचे म्हणजे या आजारावर नेमके उपचार काय आहेत? याच संदर्भात सविस्तर जाणून घेण्यासाठी त्वचाविकारतज्ज्ञ डॉ. मानसी आमडेकर यांच्याशी बातचीत.

**व्हेरीकोन्स व्हेन्स आजार नेमका काय?**

■ मानवी शरीरात रक्तवाहिन्या किंवा नसांचे अक्षरशः मोठे गुंतागुंतीचे जाळे असते. फुफुसातून शरीराच्या इतर सर्व भागांमध्ये ऑक्सिजन समृद्ध रक्त प्रसारित करण्यास मदत करण्यासाठी धमन्यांमध्ये लवचिक ऊतक किंवा स्नायूंचे जाड थर असतात.

आपल्या हृदयाकडे रक्त परत ढकलण्यासाठी शिरा प्रामुख्याने आसपासच्या स्नायूंवर आणि शिरांवर कार्यरत असतात. कधीकधी झडपा किंवा व्हॉल्व व्यवस्थित काम करत नाहीत. अशुद्ध रक्तवाहिन्या फुगून झालेल्या गाठीचा नसा फुगतात,या नसांमध्ये जमा झालेलं अशुद्ध रक्त स्नायूंना वर ढकलणे कठीण होते या स्थितीलाच व्हेरिकोज व्हेन्स म्हणतात.

**व्हेरिकोज व्हेन्स आजाराची कारण काय असतात?**

■ अशुद्ध रक्तवाहिन्या फुगून व्हेरिकोज व्हेन्स तयार होण्यास जुनी कौटुंबिक अनुवंशिकता देखील कारण असू शकते. कौटुंबिक इतिहास त्याला करणीभूत असू शकतो. पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये याचे प्रमाण जास्त आढळते आणि त्रास देखील जास्त होतो.

गर्भधारणा,अति लठ्ठपणा, दीर्घकाळ उभे राहणे आणि वजन वाढणे यामुळे देखील व्हेरिकोज व्हेन्स होऊ शकतो. नसांची जन्मजात विकृती किंवा कमकुवपणा,अति उंचीमुळे देखील रक्तपुरवठा सुरळीत न झाल्याने हा आजार उदभवू शकतो .

**व्हेरिकोज व्हेन्सची लक्षण काय असतात?**

■ पायाच्या मागच्या बाजूस गडद निळ्या किंवा जांभळ्या रंगाच्या रक्तवाहिन्या फुगलेल्या दिसतात. या फुगलेल्या शिरा अधून मधून दुखतात. अशा व्यक्तीला जास्त वेळ उभे राहता येत नाही. शिवाय चालताना देखील पायामधे प्रचंड वेदना होतात. अनेकदा व्हेरिकोज व्हेन्सच्या कारणामुळे मनुष्य बेशुद्ध देखील पडतो.

**या आजारावर उपचार काय आहेत?**

■ व्हेरिकोज व्हेन्सच्या काही प्रकरणात मुख्य समस्या कॉस्मेटिक असल्याने कोणत्याही उपचारांची आवश्यकता नसते. परंतु त्या व्यक्तीला वैद्यकीय मदत घेण्याची आवश्यकता असते. उपचार पर्यायामध्ये रुग्णाचे वजन,उपचाराचा इतिहास,एलजीर्चा इतिहास आणि शस्त्रक्रिया आणि भूल सहन करण्याची क्षमता यावर वैद्यकीय उपचार अवलंबून असतात. सौम्य प्रकरणामध्ये डोक्याखाली उशी घेऊन पाय उंच करून झोपण्याची शिफारस असते. स्केलेरोथेरेपी,लेझर थेरेपी,पायाच्या काही शिरा काढून टाकणे, असे काही उपचार उपलब्ध आहेत. ■ ■

## सज्जन जैन सपोर्ट ट्रस्ट कृत व्हीलचेअर बास्केटबॉल प्रात्यक्षिक सामने



लवचिकता, सर्वसमावेशकता आणि खेळाच्या परिवर्तनकारी शक्तीचा एक प्रभावी उत्सव म्हणून, अर्केड डेव्हलपर्सच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या सज्जन जैन सपोर्ट ट्रस्टने, प्रोजेक्ट मुंबईच्या सहकार्याने, आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त एका रोमांचक व्हीलचेअर बास्केटबॉल प्रात्यक्षिक सामन्याचे आयोजन केले.

खेळांमध्ये सुलभता, सर्वसमावेशकता आणि समान सहभागाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात खेळाडू, समर्थक आणि समुदाय नेते एकत्र आले, ज्यांनी दिव्यांग व्यक्तींची प्रतिभा आणि दृढनिश्चय अधोरेखित केला.


या प्रात्यक्षिक सामन्याने उपस्थितांना एक प्रेरणादायी अनुभव दिला, तसेच खेळ हे सक्षमीकरण आणि सामाजिक बदलासाठी एक सार्वत्रिक व्यासपीठ म्हणून काम करू शकतात या विश्वासाला बळकटी दिली.

अर्केड डेव्हलपर्सचे संचालक अर्पित जैन यांनी या उपक्रमाला पाठिंबा देत सांगितले की, अर्केड डेव्हलपर्समध्ये आमचा विश्वास आहे की खरी प्रगती केवळ आपण बांधलेल्या जागांमुळे नाही, तर आपण उन्नत केलेल्या समुदायांमुळे परिभाषित होते.

हा व्हीलचेअर बास्केटबॉल प्रात्यक्षिक सामना एक सर्वसमावेशक समाज निर्माण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, जिथे प्रत्येकाला सहभागी होण्याची, उत्कृष्ट कामगिरी करण्याची आणि सन्मानित होण्याची संधी मिळते.

सर्वांसाठी सन्मान, आत्मविश्वास आणि समान संधींना प्रोत्साहन देण्यासाठी सज्जन जैन सपोर्ट ट्रस्ट आणि प्रोजेक्ट मुंबई यांच्यासोबत सहभागी होताना आम्हाला सन्मान वाटतो. ■ ■

## त्वचेच्या समस्येसाठी बोर



थंडीच्या दिवसांत बाजारात आवर्जून दिसणारे फळ म्हणजे बोरं. या काळात खाण्या-पिण्याची चंगळ असते म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

फळं, भाज्या, रानमेवा हे सगळेच या काळात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. पण या काळात मिळणाऱ्या बोरांकडे आपले म्हणावे तितके लक्ष जातेच असे नाही. पण लहान दिसणारे हे फळ आवर्जून खायला हवं. आरोग्याच्या विविध तक्रारींवर या फळाचा अतिशय चांगला उपयोग होत असून हा रानमेवा फायदेशीर असतो.

सी व्हिटॅमिन हे केवळ आंबट फळांमध्ये असते असा आपला समज असतो. मात्र बोरांमध्ये सी व्हिटॅमिन जास्त प्रमाणात असल्याने प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी बोरांचा आहारात आवर्जून समावेश करावा. वजन कमी करणाऱ्यांसाठी बोरं हे अतिशय उत्तम फळ आहे. कारण यामध्ये कॅलरीजचे प्रमाण कमी असूनही ऊर्जा जास्त प्रमाणात असते. बोरांमध्ये अँटीऑक्सिडंटसचे प्रमाण चांगले असते. त्यामुळे त्वचा आणि केसांच्या समस्या दूर होण्यास मदत होते. इतकेच नाही तर कॅन्सरसारखा असाध्य आजार होऊ नये म्हणूनही ही अँटीऑक्सिडंटस उपयुक्त ठरतात. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# सफारी बुकिंगसाठी बनावट आधार कार्ड

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २९ :

नाताळच्या सुट्ट्यांमध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात मोठ्या संख्येने पर्यटक येत आहेत. गर्दीच्या काळात, गेल्या दोन दिवसांत मोहर्ली कोअर गेटवर तपासणी दरम्यान २१ पर्यटक बनावट आधार कार्ड वापरताना पकडले गेले.

मोहर्ली (कोअर) रेंज फॉरेस्ट ऑफिसर अरुण गोंड यांनी क्रूझर सफारी बुकिंगसाठी ओळखपत्रे तपासताना ही माहिती शोधून काढली.दरम्यान या प्रकरणानंतर स्पॉट वर केली जाणारी क्रूझर बुकिंगची पद्धत बंद करण्यात आली आहे. पडताळणीनंतर, २१ आधार कार्ड बनावट असल्याचे आढळून आले. सूत्रांनुसार, काही स्थानिक आणि रिसॉर्ट ऑपरेटर सहभागी असू शकतात.

क्रूझर वाहनांसाठी सफारी बुकिंग फक्त चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक रहिवाशांसाठी राखीव आहे. या नियमाचा फायदा घेत काही लोकांनी बेकायदेशीरपणे सफारी बुकिंग मिळवण्यासाठी स्थानिक नावे किंवा पत्त्यांसह बनावट आधार कार्ड मिळवल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे वन्यजीवप्रेमी संतप्त झाले आहेत आणि या फसवणुकीत सहभागी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत आहेत. वनविभागाने पुढील तपास सुरू केला आहे.

ताडोबा कॉर्प्सचे उपवनसंरक्षक आनंद रेड्डी यांनी बनावट आधार कार्ड वापरल्याची पुष्टी केली. त्यांनी सांगितले की या प्रकरणाची चौकशी केली जात आहे.

# लैंगिक अत्याचार पिडितेची ठाण्यात पायपीट?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

इंस्टाग्रामवरुन झालेल्या ओळखीतून प्रेमाच्या जाळ्यात अडकवत तरुणाने मुलीचे लैंगिक शोषण केले. तिला हा सगळा प्रकार लक्षात आल्यानंतर पिडिताने तक्रार देण्यासाठी पोलीस ठाणे गाठले. मात्र तिची तक्रार नोंदवण्याएंवजी एमआयडीसी पोलिसांनी आल्या पावली परत पाठवले. सायबर पोलिसांनी वाद आपसांत मिटविण्याचा उलटा सल्ला दिला. अखेर हतबल झालेली मुलगी पोलीस उपायुक्तांपुढे पोचली आणि पुढे पोलिसांची कानउघाडणी झाली. पोलीस उपायुक्त ऋषिकेश रेड्डी यांनी पोलीस निरीक्षकांची कान उघाडणी करत तरुणावर गुन्हा दाखल करायला लावला.

बेसा परिसरातील रहिवासी पीडित तरुणी ही इंग्रजी विषयात एमए करते. तिची इंस्टाग्रामवरुन २०२१ मध्ये बालाघाट जवळच्या टेकडी-खैरलांजी गावातील शुभम घनश्याम गाऊपाले (२५) याच्याशी ओळख झाली. त्याने कल्पनाचा भ्रमणदूरध्वनी मिळवत चॅटिंग सुरू केले. मैत्री वाढवली. काही दिवसांतच तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. ती १७ वर्षांची असतानाच शुभमने नोव्हेंबर २०२२ मध्ये तिच्या खोलीवरही जाणे येणे सुरू केले. दोघांत शारीरिक संबंध निर्माण झाले. कल्पनाचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ काढले. त्यानंतर तो वारंवार तिला शारीरिक संबंधाची मागणी करायला लागला. नकार दिल्यास बदनामीची धमकीही तो देत होता.

त्याच्या धमकीला कंटाळून कल्पनाने पोलिसांत तक्रार केली. मात्र घटनास्थळ हद्दीत नसल्याचे सांगत एमआयडीसी पोलिसांनी तिला परत पाठवले. नंतर तिने सायबर पोलीस ठाणे गाठून तक्रार देण्याचा प्रयत्न केला. तिथे चक्क पिडितेला प्रकरण आपसात मिटवून घेण्याचा सल्ला देण्यात आला. अखेर पिडिताने पोलीस उपायुक्तांसमोर गाऱ्हाणे मांडले.

पोलीस उपायुक्त ऋषिकेश सिंगा रेड्डी यांनी तरुणीच्या तक्रारीची दखल घेतली. तिला एमआयडीसी पोलीस ठाण्यात पाठवून वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची कानउघाडणी केली. अखेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# बच्चू कडू यांच्या मोर्चात सहभागी होणार मूत्रपिंड काढलेले पीडित

## कंबोडियात किडनी विक्री प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २९ :

मूत्रपिंड काढल्यानंतर चीनशी संबंधित कंबोडियन डॉक्टर चिआंग हा अवघ्या काही तासात केवळ चीन येथून आलेल्या रुग्णांना मूत्रपिंड लावत होता. भारतातील अनेकांचे मूत्रपिंड प्रत्यारोपित करण्यात आल्याची माहिती आरोपींनी दिली आहे.

या प्रकरणाचा तपास ब्रम्हपुरी पोलिसांकडून काढून स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. तसेच विशेष पोलीस पथक (एसआयटी) अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या नेतृत्वात कार्यरत राहणार आहे. दरम्यान कुडे याच्यासोबत कंबोडिया मूत्रपिंड काढलेले सहा जण बच्चू कडू यांच्या मोर्चात सहभागी होणार आहेत.

दरम्यान, रामकृष्णन सुंचू व हिमांशू भारद्वाज यांनी त्यांच्यासोबत कंबोडिया येथे गेलेल्या आणखी काही युवकांची नावे सांगितल्याची माहिती आहे. तर रोशन कुडे याच्यासोबत गेलेले सहा पीडित ३ जानेवारीच्या मोर्चात सहभागी होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मूत्रपिंड विक्री प्रकरणात कंबोडिया येथे कार्यरत



आणि चीन येथून आलेला डॉ. चिआंग मुख्य सूत्रधार असल्याच तपासात उघडकीस आले आहे.

कंबोडिया येथे मूत्रपिंड काढल्यानंतर अवघ्या काही तासांच्या आत चिनी रुग्णांना मूत्रपिंड लावण्यात येत होते अशीही माहिती तपासात समोर आली आहे. पोलिसांना रोशन कुडे याच्यासोबत गेलेल्या सर्व युवकांची नावे मिळाली आहे. तसेच कुडे याच्या पूर्वी व नंतर गेलेल्या काही तरुणांचीही नावे मिळाली आहेत.

मूत्रपिंड प्रकरणात दररोज नवनवीन माहिती समोर येत असल्याने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी हे प्रकरण ब्रम्हपुरी पोलिसांकडून काढून स्थानिक गुन्हे शाखेकडे सुपूर्द केले आहे. तसेच या प्रकरणात गठीत केलेली एसआयटी अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या नेतृत्वात कार्यरत राहणार आहे.

शेतकरी नेते बच्चू कडू यांचा मिंथूर ते नागभीड असा भव्य मोर्चा ३ जानेवारीला आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चात रोशन कुडे याच्यासोबत मूत्रपिंड विक्री केलेले सहा रुग्ण सहभागी होणार असल्याची माहिती आहे. तत्पूर्वी हे सर्व पीडित रुग्ण कुडे याची भेट घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या प्रकरणात पोलिसांकडे आणखी काही नावे समोर आली आहे. तसेच रामकृष्णन सुंचू व हिमांशु यांनी पोलिसांना जी नावे सांगितली आहेत त्यांची माहिती गोळा केली जात आहे. सोमवारी (२९ डिसेंबर) रामकृष्णन व हिमांशू या दोघांना न्यायालयात हजर केले जाणार आहे.